cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५५ | मंगळवार, दि.७ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जनतेची हाक अन् न्यायालयाची साथ !

जनतेचे मूलभूत हक्क आणि घटनात्मक हक्क या दृष्टीने अलीकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये दिलेल्या निकालांनी सर्वसामान्य माणसांना दिलासा मिळाला आहे. गत आठवडा संपता संपता न्यायालयाने मालमत्तेचा हक्क आणि वैद्यकीय प्रवेशांबाबत दिलेल्या दोन निर्देशांनी न्यायाची आस जागी झाली आहे. प्रशासन सर्वसामान्यांच्यावर कर्तव्यांचे ओझे टाकत असताना त्यांच्या हक्कांच्या बाबत मात्र नोकरशाहीकडून होत असणारे अक्षम्य दुर्लक्ष सध्या सर्वत्र चिंतेचा विषय आहे. सर्वसामान्यांचे हक्क डावलले जातात आणि त्यांच्या हिताचे निर्णय लवकर होत नाहीत.




# विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना विश्रामगृहात डांबलं

## भाजप आमदार हरीश पिंपळेंचा रौद्रावतार

**अकोला । प्रतिनिधी**

**अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुरमध्ये भाजप आमदार हरीश पिंपळे यांचा रौद्रावतार बघायला मिळाला आहे. आमदार पिंपळे यांनी विमा कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चक्क मुर्तीजापुर येथील शासकीय विश्रामगृहाच्या खोलीत डांबले असल्याचे पुढे आले आहे. विमा कंपनीच्या हलगर्जीपणामुळे २०२३ मधील ५३० शेतकऱ्यांना पंतप्रधान कृषी विमा योजनेचा लाभ मिळाला नाही. त्याच्याच रागातून आमदार पिंपळे यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विश्रामगृहाच्या खोलीत डांबले.**

परिणामी, शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत अधिकाऱ्यांना खोलीतून बाहेर काढणार नसल्याचा आमदार पिंपळे यांचा निर्धार केला. या प्रकरणानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण तयार झाले होते. त्यानंतर घटनास्थळावर पोलीस आणि महसूल अधिकारी दाखल झाले असता हे प्रकरण काहीसे शांत झाले. दुसरीकडे, नाफेडच्या खरेदी केंद्रावर बारदाने (पोते) नसल्याने गेल्या आठ ते दहा दिवसापासून शेतकऱ्यांना कडाक्याच्या थंडीत रात्र जागून काढत सोयाबिनची रखवाली करावी लागत आहे. नांदेड जिल्ह्यात शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी केली. विक्रीची तारीख कळल्यानंतर शेतकऱ्यांनी इथे सोयाबीन विक्रीसाठी आणले. काही शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी झाल्यानंतर मात्र बारदाने अर्थात पोते संपल्याचे कारण दाखवून खरेदी




बंद करण्यात आली. शेतकऱ्यांनी ओरड केल्यानंतर त्यांना स्वत: बारदाने आणा नाफेडकडून बारदाने आल्यास तुम्हाला बारदाने परत करू, असे सांगण्यात आले. पण एका बारदाण्याची किंमत ही ४६ रुपये इतकी आहे. त्याचा भुर्दंड शेतकरयांना बसतोय. बारदाने संपल्याने अनेक शेतकरी आठ ते दहा दिवसापासून रांगेत ताटकळत आहेत. एक दिवसाचा थांबण्याचा किराया ट्रॅक्टर मालक दीड ते हजार रुपये आकारत असल्याने त्याचा नाहक भुर्दंड बसत आहे. रात्री सोयाबीन चोरीला जाऊ नये म्हणून त्यांना कडाक्याच्या थंडीत रात्री आपल्या ट्रॅक्टर जवळ झोपावे लागत आहे.

## पंकजा मुंडे यांनी घेतली केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट



**मुंबई । प्रतिनिधी**

**रज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन चरित्र असलेले 'श्रीमानयोगी' पुस्तक यावेळी ना. पंकजाताईंनी त्यांना भेट स्वरूपात दिले.**

ना. पंकजाताई मुंडे सोमवारी दिल्ली दौर्यावर होत्या. दुपारी त्यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या कार्यालयास जाऊन त्यांची भेट घेतली, त्यांचे आभार मानण्यासाठी त्यांना 'छत्रपती शिवाजी ◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडे यांचे मंत्रीपद धोक्यात !

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणी सध्या अटकेत असलेले वाल्मिक कराड मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू सहकारी आहेत. तसेच वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचे सख्य असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळातून धनंजय मुंडे यांची हकालपट्टी करावी, त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी करत स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती, ठाकरे शिवसेनेचे अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड, खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर, भाजपाचे सुरेश धस, अजित पवार यांच्या पक्षाचे प्रकाश सोळंके, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, शिवसंग्रामच्या ◀◀ पान २ वर

### विष्णू चाटेसह चौघांच्या पोलीस कोठडीत वाढ

केजः मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक असलेल्या विष्णू चाटे याच्या पोलीस कोठडीत चार दिवसांची तर इतर तीन आरोपीच्या कोठडीत बारा दिवसांची वाढ करण्यात आली आहे. जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले व विष्णू चाटे या चौघाची पोलीस कोठडी संपली. त्यामुळे त्यांना केजच्या न्यायालयात हजर केले. या प्रकरणात आणखी तपास आवश्यक आहे असे म्हणत तपास अधिकाऱ्यांनी वाढीव कोठडीची मागणी केली. विष्णू चाटे व इतरांनी वाल्मिक कराड याच्याशी बोलणे करून दिले आणि कराड याने खंडणी मागितली. त्यानंतर संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्यामुळे हे सगळे गुन्हे एकमेकांशी निगडित आहेत, त्यामुळे कोठडीत वाढ मिळणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद तपास अधिकारी आणि त्यांच्या वकिलांनी केला.

## राजीनाम्यासाठी सर्वपक्षिय नेत्यांनी घेतली राज्यपालांची भेट



### धनंजय मुंडे जातीयवाद करत आहेत – जरांगे पाटील



आमची लढाई आरक्षणाचीच आहे आरक्षणाची लढाई आम्ही सोडलेली नाही पण तुम्ही लोकं मारून टाकायला लागल्यानंतर बोलायचं नाही का.? असा सवाल जरांगे यांनी धनंजय मुंडे यांना केला आहे. धनंजय मुंडे जातीयवाद करत आहेत, ते टोळ्या पाळताहेत असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. मी संतोष देशमुख हत्या प्रकरणात लढत राहणार असा इशारा देखील जरांगे यांनी दिला. ते अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी संवाद साधत होते. धनंजय मुंडे ओबीसींना फोन करून त्यांच्या बाजूने उभे राहायला सांगताहेत असा आरोप देखील त्यांनी केला. लोकांच्या पोरांच्या हत्या करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी टोळ्या पाळल्याचे मनोज जरांगे म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणी तत्परता का दाखवली नाही असा सवालही त्यांनी केला. धनंजय मुंडेंचे गुंड हे संतोष देशमुखांच्या भावाला धमक्या देत आहेत. त्यामुळे मी गुंडांना बोललो, कुठल्या जातीला बोललो नाही असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. या प्रकरणात मराठा ओबीसी संबंध येतो कुठे असा सवाल देखिल मनोज जरांगे यांनी उपस्थित केला.

### शरद पवार यांचे फडणवीसांना पत्र



बीड : संतोष देशमुख यांच्या मारेकरी अद्याप पूर्णतः पकडले गेले नाहीत. तसेच या प्रकरणाची सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या काही राजकिय आणि सामाजिक कार्यकर्त्यांना मुंडे समर्थक आणि वाल्मिक कराड समर्थकांकडून धमकीचे फोन येत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे या प्रकरणी पाठपुरावा करणाऱ्या लोकप्रतिनिधींना सुरक्षा पुरवावी, अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले आहे. शरद पवार आपल्या पत्रात म्हणाले की, बीड– परळी भागात यापूर्वी देखील माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे या गुंड प्रवृत्तीची पाळेमूळे खणून काढण्याची राज्यभरातील अनेक लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे व त्यासाठी ते सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा करत असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

### फेक नॅरेटिव्ह तयार केला जातोय – मंत्री धनंजय मुंडे



अजित पवारांच्या भेटीनंतर धनंजय मुंडे यांनी सोमवारी (दि. ६) पत्रकारांशी बोलताना राजीनाम्याबाबत आपली भुमिका मांडली. राजीनाम्याच्या विषयावर कसलीच चर्चा झालेली नाही. कुणी काय आरोप करावेत, हे लोकशाहीत प्रत्येकाला अधिकार आहे. माझे म्हणणे आहे की ट्रायल कोर्टात होऊ द्या. तपास यंत्रणा काम करत आहे. फेक नॅरेटिव्ह तयार केला जात आहे, असा आरोप अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी केला. मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी सुमारे तासभर चर्चा केली. त्यानंतर त्यांनी राजीनाम्याबाबत स्पष्टीकरण दिले. दरम्यान, मुंडे यांनी राजीनाम्याच्या विषयावर चर्चाच झाली नसल्याचे यावेळी सांगितले.

### मनोज जरांगे यांच्यावर बीड जिल्ह्यात २४ तासांत ४ गुन्हे

बीड : परभणी येथे संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी निघालेल्या मूक मोर्चा दरम्यान झालेल्या सभेत बोलताना मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्या विषयी प्रक्षोभक वक्तव्य केले आणि ते समाज माध्यमांवर प्रसारित केल्या प्रकरणी त्यांच्या विरुद्ध बीड जिल्ह्यात गेल्या २४ तासांत बीड, केज, अंबाजोगाई, धारूर अशा चार ठिकाणी अदखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दि. ४ जानेवारी रोजी परभणी येथे संतोष देशमुख यांचे हत्येच्या निषेधार्थ असलेल्या मूक मोर्चात मनोज जरांगे यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या विषयी एकेरी भाषेत उल्लेख करून त्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही. वेळ आली तर परभणी व धाराशिव जिल्ह्यातील लोकांना आणून बीड जिल्ह्यातील विशिष्ट लोकांच्या घरात घूसून मारण्याची धमकी दिली. मंत्री धनंजय मुंडे यांच्या बद्दल बदनामीकारक व असंवैधानिक वक्तव्य करून त्या भाषणाचे व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल केले म्हणून हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### पुरावा नाही तोपर्यंत राजीनामा नाही : अजित पवारांची भूमिका?



न्यायालयीन चौकशी, एसआयटी आणि सीआयडी या तीनही चौकशीमध्ये जोपर्यंत धनंजय मुंडे दोषी सापडत नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होणार नाही अशी भूमिका अजित पवारांनी घेतल्याची माहिती सूत्रांकडून पुढे आली आहे. विरोधकांसह सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनीही धनंजय मुंडे यांना मंत्रिपदावरून दूर करा अशी मागणी केली होती. त्याच पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी अजित पवारांची भेट घेतली होती. सुमारे सव्वा तास मुंडेंनी अजित पवारांशी चर्चा केली आणि बीडची स्थिती समोर ठेवली. त्यानंतर आता अजित पवारांनी धनंजय मुंडे यांच्याविषयी भूमिका घेतली असल्याची माहिती आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १९.५० क्विंटल | २,७०० | २,९७० | २,९०१ |
| ज्वारी/हायब्रिड: ५७.५० क्विंटल | २,०७१ | २,५९० | २,३११ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १४८.०० क्विंटल | ५,६५० | ७,५७१ | ७,२१२ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,१०१ | ५,१०१ | ५,१०१ |
| बाजरी: २.५० क्विंटल | २,०६० | ३,००० | २,४५३ |
| मुग : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीन: ३०८.०० क्विंटल | ३,८०० | ४,१२८ | ४,०७१ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,३०० | ५,४०० | ४,८५० |

## छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्याच्या हल्ल्यात ९ जवान शहीद

**बिजापूर । वृत्तसंस्था**

छत्तीसगडमधील बिजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलाच्या वाहनावर सोमवारी (दि.६) दुपारी भ्याड हल्ला केला. सुरक्षा दलाच्या वाहनाला आयईडीने लक्ष्य केले. या स्फोटात भारतीय लष्कराच्या ८ जवानांसह एक चालक शहीद झाला आहे. तर ६ हून अधिक जवान गंभीर जखमी झाले आहेत. सोमवारी दंतेवाडा, नारायणपूर ◀◀ पान २ वर

## शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गावागावांमध्ये कॅम्प घेऊन मार्गदर्शन करा

### आ.संदीप क्षीरसागरांकडून तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकार्यांना निर्देश



बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक व दुर्बल घटक यांच्याकरिता विविध योजना राबविण्यात येतात. परंतु या योजना परिपूर्ण रीतीने पोहचल्या पाहिजेत याकरिता प्रशासनाने बीड मतदारसंघात समिती स्थापन करून, गावोगावी जाऊन त्याठिकाणी कॅम्प घेऊन लाभार्थींना मार्गदर्शन करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले आहेत.

ग्रामीण भागातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, विविध दुर्बल घटक तसेच समाजातील सर्वच घटकांसाठी शासनस्तरावरून ◀◀ पान २ वर

# एचएमपीव्हीचा भारतात शिरकाव ; कोरोना एवढाच धोका ?

## बाधितांचा आकडा ३ वर, अलर्ट जारी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**चीनमध्ये पसरणारा ह्युमन मेटाप्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) संसर्ग भारतात पोहोचला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेला कर्नाटकातील दोन मुलांमध्ये संसर्ग आढळला आहे. तीन महिन्यांची मुलगी आणि आठ महिन्यांच्या मुलामध्ये संसर्ग आढळून आला आहे. याशिवाय गुजरातमध्ये दोन महिन्यांच्या बाळामध्येही संसर्ग आढळून आला आहे. या घटनांनंतर अलर्ट जारी करण्यात आला आहे.**

सध्या चीनमध्ये ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) चा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या विषाणूमुळे लोकांचे जीव गेल्याचे वृत्त आहे. भारतातही आरोग्य मंत्रालयाने याबाबत कडक देखरेख सुरू केली असून, अनेक राज्यांनी अॅलर्ट आणि अडवायजरी जारी केले आहेत. संक्रमित मुले आणि




त्यांच्या कुटुंबीयांचा कोणताही आंतरराष्ट्रीय प्रवासाचा इतिहास नाही. दरम्यान, २६ डिसेंबर रोजी गुजरातमध्ये एका मुलाला संसर्ग झाल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. राजस्थानमधील डुंगरपूर येथील रहिवासी असलेल्या अर्भकाला २४ डिसेंबर रोजी श्वासोच्छवासाच्या संसर्गाची लक्षणे ◀◀ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# जनतेची हाक अन् न्यायालयाची साथ !

जनतेचे मूलभूत हक्क आणि घटनात्मक हक्क या दृष्टीने अलीकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये दिलेल्या निकालांनी सर्वसामान्य माणसांना दिलासा मिळाला आहे. गत आठवडा संपता संपता न्यायालयाने मालमत्तेचा हक्क आणि वैद्यकीय प्रवेशांबाबत दिलेल्या दोन निर्देशांनी न्यायाची आस जागी झाली आहे. प्रशासन सर्वसामान्यांच्यावर कर्तव्यांचे ओझे टाकत असताना त्यांच्या हक्कांच्या बाबत मात्र नोकरशाहीकडून होत असणारे अक्षम्य दुर्लक्ष सध्या सर्वत्र चिंतेचा विषय आहे. सर्वसामान्यांचे हक्क डावलले जातात आणि त्यांच्या हिताचे निर्णय लवकर होत नाहीत. प्रत्येक निर्णयासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागतात हे अलीकडच्या काळातील नोकरशाहीचे मोठे अपयश आहे. प्रत्येक बाब कायद्यानुसार आहे किंवा नाही आणि प्रत्येक बाबीची घटनात्मकता जर न्यायालयाला सांगावी लागत असेल तर देशात भारतीय प्रशासकीय सेवेला आणि त्या सेवेस पात्र होण्यास नेमके काय महत्त्व राहिले? कायदा आणि घटनेचा अन्वयार्थ जनतेच्या हिताच्यादृष्टीने लावून सुशासनाचे दर्शन घडवणे हे नोकरशाहीचे काम असले पाहिजे. मात्र लोकांना त्रास कसा होईल आणि त्यांच्या हक्कांना डावलता कसे येईल यासाठीच आपली बुद्धिमत्ता खर्च घालणारे प्रशासकीय अधिकारी हल्ली जिल्हा पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत दिसू लागले आहेत. याचाच अर्थ प्रशासकीय सेवेत नव्याने आलेला एखादा आयएएस अधिकारी असो किंवा प्रधान सचिव दर्जाचा सर्वोच्च अधिकारी किंवा विविध खात्यातील विविध सेवांचा अधिकारी असो प्रत्येक जण अडेलतट्टूपणाने वागू लागल्याने जनतेला हिताच्या निर्णयासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याखेरीज रस्ता उरलेला नाही. अशा काळात सर्वोच्च न्यायालय देत असलेल्या निर्णयाने सामान्य माणसांना दिलासा मिळताना दिसत आहे.

ताजी दोन प्रकरणे शुक्रवारची आहेत. देशातील वैद्यकीय महाविद्यालयाच्या रिक्त जागा आणि प्रवेशाचा गोंधळ या बाबीवर सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली. केंद्र सरकारला या संबंधित विविध घटकांशी चर्चा करून तोडगा काढावा मात्र वैद्यकीय शिक्षणाच्या जागा रिक्त ठेवू नयेत असे स्पष्टपणे बजावावे लागले. त्यामुळे पालकांचा जीव भांड्यात पडणार आहे. हे एक प्रकरण आणि दुसरे होते मालमत्तेचा हक्क घटनात्मक आहे हे जाहीर करणारे. कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीला त्याच्या मालमत्तेबद्दलचा योग्य मोबदला देण्यापासून कोणालाही वंचित ठेवता येऊ शकत नाही असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात नोंदवले. न्यायमूर्ती भूषण गवई आणि के.व्ही. विश्वनाथ यांच्या पिठासमोर सुनावणी होत असणारे एका प्रकरणात राज्यघटनेत १९७८ साली झालेल्या ४४ व्या घटनादुरुस्तीचा मुद्दा चर्चेला आला होता. या घटनादुरुस्तीनुसार मालमत्तेचा अधिकार हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार राहिलेला नाही. मात्र कलम ३० अंतर्गत हा हक्क घटनात्मक हक्क आहे आणि कल्याणकारी राज्याच्या तत्त्वात तो मानवी हक्क म्हणून आपले स्थान कायम राखतो असे स्पष्टीकरण न्यायालयाने केले आहे. कलम ३० अ नुसार कायदेशीर चौकटीत कोणत्याही व्यक्तीला त्याच्या मालमत्तेपासून वंचित ठेवता येणार नाही आणि भूसंपादनासाठी द्यावयाची जी रक्कम आहे ती रक्कम देताना संपादन केव्हा केले त्याऐवजी आजच्या काळात त्याचा दर काय आहे हे लक्षात घेऊन तो देणे आवश्यक आहे अशी भूमिका न्यायालयाने घेतली आहे. संबंधित प्रकरणात यापूर्वी उच्च न्यायालयात जो आदेश झाला त्या तारखेला बाजारभाव जो असेल त्या भावाने सरकारने जमीन संपादनाचा मोबदला दिला पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

हे प्रकरण खूप सविस्तरपणे समजून घेण्याची आवश्यकता आहे. कारण, देशातील अनेक प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना नोकरशाही ज्या पद्धतीने आपले अधिकार वापरते त्यानुसार सर्वसामान्य जनतेसमोर त्यांच्या धाकात राहण्याशिवाय पर्याय राहत नाही. विशेषत: केंद्र सरकारच्या रेल्वेसारख्या प्रकल्पात सर्वसामान्य माणसाचे काही चालतच नाही. त्याची जमीन सरकारी अधिकाऱ्यांनी दबावाखाली ताब्यात घेतली आणि त्यावर रेल्वे रूळ टाकले तरी त्यांच्या विरोधात कुठलीही यंत्रणा शेतकऱ्यांना किंवा जमीन मालकांना मदत करत नाही. मात्र त्याच रूळावर जर शेतकरी मोबदल्यासाठी रेल्वे अडवून बसले तर त्यांच्यावर इतके भयंकर गुन्हे दाखल होऊ शकतात की आपल्याच जमिनीत बसले असताना सुद्धा बेकायदा हस्तगत केलेल्या त्यांच्याच जमिनीत त्यांना गुन्हेगार ठरवले जाऊ शकते. त्यांना त्या प्रकरणात जामीनही मिळत नाही आणि सरकारचे गुन्हेगार ठरवल्याने मोबदला देण्याची आणि त्याला कालमर्यादेची जबाबदारीही रेल्वेचे अधिकारी पार पाडत नाहीत. हे केवळ रेल्वेत होते असे नव्हे. महसूल प्रशासन किंवा वन आणि इतर खात्यांनी जर अशाच प्रकारे जमिनी हस्तगत केल्या तर त्या जमिनी शासन एका खात्याकडून दुसऱ्या खात्याकडे वर्ग करत राहते. त्यांना त्याचा वापर करायचा नसला तरीसुद्धा आपल्याला नको असलेली जमीन दुसऱ्या खात्याकडे वर्ग करून शेतकऱ्यांना अक्षरश: त्रस्त करून सोडले जाते. मात्र त्यांना त्यांची जमीन परत दिली जात नाही की मोबदलाही दिला जात नाही. या धोरणाच्या विरोधात न्यायालयात न्याय मागणे आणि लढून जिंकणे हे खूप अवघड तितकेच खर्चिक आणि दोन-तीन पिढ्यांना प्रचंड मनस्ताप देणारे असते. देशात अनेक प्रकल्पांमध्ये शेतकऱ्यांशी करार सुद्धा न करता किंवा कोणतीही सूचना न देता केवळ जमिनीवर चुन्याच्या रेषा मारून शासकीय अधिकाऱ्यांनी जमिनींचे संपादन करून घेतल्याची उदाहरणे आहेत. मात्र त्याचा योग्य मोबदला देण्याची जबाबदारी मात्र पार पाडलेली नाही. अनेकांच्याकडे तर आपल्या गेलेल्या जमिनीचे कागद सुद्धा नाहीत. त्यामुळे तिसऱ्या पिढीतील कोणी लढायला सिद्ध झाला तरी त्याच्या हाताला काही लागत नाही. हताशपणे हा अत्याचार लोकांना सहन करावा लागतो. अशावेळी सर्वोच्च न्यायालयाने मालमत्तेचा हक्क हा घटनात्मक हक्क आहे अशी भूमिका घेतल्याने त्याचे दूरगामी परिणाम दिसून येणार आहेत. यामुळे सर्वसामान्यांची एकतर्फी सुरू असणारी लढाई अचानक त्यांच्या बाजूने होणार आहे. हक्काचा असा लढा अनेक क्षेत्रात सामान्यांना लढायचा आहे. न्यायालय त्यांना त्यातही साथ देईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

# युको बँकेचा ८३ वा वर्धापनदिन बीड शाखेत साजरा

बीड । प्रतिनिधी

शाखेला आज दहा वर्षा पूर्ण होत आहेत, खातेदाराच्या विश्वासाची व आदराची बँक समजली जाते, खातेदारांच्या उपस्थितित बँकेचा वर्धापनदिन उत्साह साजरा करण्यात आला. शाखा अधिकारी देवेंद्र उऱ्हे साहेब, निमेन चरण, प्रज्ञाशिल मोरे, गणेश नेमाने, रामेश्वर कदम, किशोर धोत्रे, सर्जेराव तावरे आदि. शुभेच्छा देताना खातेदार - परमेश्वर खंदारे



# बीडमध्ये संविधान बचाव जनआक्रोश मोर्चा

बीड । प्रतिनिधी

**परभणी येथील घटनेचा निषेध व्यक्त करत, बीडमध्ये आंबेडकरवादी संघटनेच्यावतीने, संविधान बचाव जनआक्रोश मोर्चाचे आयोजन आज (दि.६) सोमवार रोजी करण्यात आले आहे. या मोर्चाला शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरुवात झाली. हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.**

या मोर्चाच्या माध्यमातून, सोमनाथ सुर्यवंशीच्या हत्येस जबाबदार पोलीसांवर गुन्हे दाखल करा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणारे गृहमंत्री अमित शहा यांची मंत्री मंडळातुन हकालपट्टी करा, परभणी येथील महिलांवर अमानुष लाठीचार्ज करणाऱ्या पोलीसांवर गुन्हे दाखल करा, देशातील सर्व निवडणूका मतपत्रिकेवर घ्या, शासकिय नोकरीतील गुत्तेदारी पध्दती रद्द करुन कायमस्वरुपी नौकरी द्या व रिक्त असलेल्या राखीव जागा त्वरीत भरा, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी भारत सरकार शिष्यवृत्ती दरमहा वेळेवर द्या, शासकिय सेवेतील आरक्षणामधील वर्गीकरण कायदा रद्द करा, शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करा. या प्रमुख मागण्या करण्यात येत आहेत. दरम्यान, यावेळी मोर्चेकऱ्यांच्या हातामध्ये विविध फलक पाहायला मिळत आहेत.




# चांगदेव नाईकवाडेची भारतीय सवाते संघात निवड

वडवणी । प्रतिनिधी

आज दिनांक २७ ते २९ डिसेंबर २०२४ रोजी कलकत्ता या ठिकाणी ७वी राष्ट्रीय सवाते स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. संपूर्ण देशभरातून आलेल्या स्पर्धकांमध्ये महाराष्ट्राचे खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी करून १२ सुवर्ण ,८ रौप्य,११ कांस्य पदकाची कमाई केली व तिसऱ्या ट्रॉफीचा मानकरी होण्याचा बहुमान महाराष्ट्राला मिळाला.

सीनियर वयोगटामध्ये मोरवड चा चांगदेव नाईकवाडे याने रौप्य पदक मिळवून महाराष्ट्राला तिसरा ट्रॉफीचा मानकरी ठरवण्यात सिंहाचा वाटा उचलला त्याबद्दल चांगदेवच्या सर्वत्र अभिनंदन होते आहे त्याचबरोबर ९ ते १२ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या आशियाई स्पर्धेसाठी चांगदेवची निवड भारतीय संघात करण्यात आलेली आहे. पदक विजेत्या सर्वच मुलांचे विविध स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे तसेच संघटनेचे अध्यक्ष - शाम राक्षे सचिव - सुहास धाईंजे विविध जिल्ह्यांचे प्रमुख अभिजीत हरपळे सुशांत पोळ ऋषिकेश कडू शहाणुर पटेल कुशल लोहार सुदर्शन बालटे यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिला.



# मंत्री धनंजय मुंडेसाठी आता राष्ट्रवादी आक्रमक, आ.सुरेश धसांवर गंभीर आरोप

बीड । प्रतिनिधी

**संतोष देशमुख हत्या प्रकरणावरुन आ. सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या नंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस देखील आक्रमक झाली आहे. राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे यांनी पत्रकार परिषदेतून आ. सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले असून सुरेश धसांनी या आरोपांची उत्तरे द्यावीत असे म्हटले आहे.**

अविनाश नाईकवाडे यांनी पत्रकार परिषदेतून काही लोकप्रतिनिधी जिल्ह्याची बदनामी करित असल्याचे सांगितले. आम्ही इतके दिवस शांत होतो, पण आता किती सहन करणार? मंत्री धनंजय मुंडेंचे नेतृत्व संपवु पाहणारे आ.सुरेश धस कोण आहेत? बुट्टया गायकवाड हत्या प्रकरणातील



आरोपी संजय तांबडे वापरत असलेला मोबाईल क्रमांक गायकवाड हत्या प्रकरणाच्या काही दिवस अगोदर सुरेश धस वापरत होते.आबासाहेब विक्रम धस (आरोपी ११) याच्याकडून ३ लाख जप्त करण्यात आले होते, त्या आरोपीचे आणि धसांचे संभाषण झाले होते, या संबंधावर आ.सुरेश धस काय बोलणार आहेत असे नाईकवाडे म्हणाले. आ. धस गुंडगिरीवर बोलतात पण पुण्यातील गुंड निलेश घायवाळ सोबत सुरेश धस काय करित आहेत? खंडणी प्रकरणात सुरेश धसांनी ज्याचा उल्लेख केला तो नितीन बिक्कड हा सुरेश धसांचा माणूस आहे,याचही सुरेश धसांनी उत्तर द्यावं असे नाईकवाडे म्हणाले.

### जरांगेंनाही केली विनंती

पत्रकार परिषदेतून अविनाश नाईकवाडे यांनी मनोज जरांगे यांनाही विनंती केली. मनोज जरांगे आमच्यासाठी दैवत, आजपर्यंत स्टेजवर एकटे बोलायचे, आज काय वेळ आली? तुमचे व्हिडिओ दाखविणारा मी आहे. तुमच्यासाठी फुलं वेचणारा मी आहे. पण तुमच्या तोंडातून हिंसेची भाषा योग्य नाही. मराठा समाजाला हिंसेकडे नेऊ नका असे नाईकवाडे म्हणाले.

# फॅशन फ्युजन प्रदर्शन आणि सेल राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धा

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, महाविद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

बीड । प्रतिनिधी

**तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, बीडच्या वतीने प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्ताने ते राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंतीच्या निमित्ताने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमापैकी दिनांक ८, ९ व १० जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत फॅशन फ्युजन प्रदर्शन आणि सेलचे आयोजन करण्यात आलेले आहे.**

प्रदर्शनातील प्रमुख आकर्षण म्हणजे फॅशन ज्वेलरी, डिझायनर सारीज, फॅशनेबल ड्रेसेस, घरगुती सजावटी वस्तू, रंगोली पॅचेस, कुशन्स, डिझाईनर बेबी ड्रेसेस, डिझाईनर गारमेंट्स, पेंटिंग्स, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचे उत्पादन इत्यादी सह विविध डिझाईन पहावयास मिळणार आहेत. प्रदर्शनातील सर्व डिझाईन साहित्य हे महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी केलेल्या कलाकृतीचे असणार आहे व त्यातूनच विद्यार्थिनींना कमवा व शिका योजनेअंतर्गत आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने प्रदर्शनाच्या वेळी सेलचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय ड्रेस डिझायनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून ही स्पर्धा सकाळी ११ ते दुपारी ०४ या वेळेत संपन्न होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थिनींना प्रवेश शुल्क ५०० रुपये असणार आहे तर स्पर्धेचे बक्षीस स्वरूप प्रथम पारितोषिक रोख रक्कम १०००० रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम ७००० रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रोख रक्कम ५००० रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. राज्यस्तरीय ड्रेस डिझायनिंग स्पर्धा, नाव नोंदणी बाबत संपर्क क्रमांक : ९३१०६६६६५२, वरील सर्व कार्यक्रमास बीड शहरातील जास्तीत जास्त महिला भगिनींनी कार्यक्रमास सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड. महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## पान १ वरून...

### पंकजा मुंडे यांनी घेतली केंद्रीय

महाराज' यांचे जीवन चरित्र 'श्रीमानयोगी' भेट स्वरूपात दिले. अर्थात, छत्रपती शिवराय आपल्यासाठी आपला अभिमान आहेत आणि आपल्या जीवनातील प्रत्येक क्षणाचे मार्गदर्शकही आहेत असे त्यांनी म्हटले. महाराष्ट्रामधील सर्व विषयांवर संपूर्ण सहयोग करण्याचे आश्वासन या प्रसंगी भूपेंद्र यादव यांनी दिले असल्याचे ना. पंकजाताईंनी म्हटले आहे.

--------------

### धनंजय मुंडे यांचे

ज्योतीताई मेटे आदींसह इतर पक्षाच्या आमदारांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने राज्यपालांची सोमवारी दि.६ रोजी भेट घेतली. वाढत चाललेल्या घडामोडीमुळे आणि सर्वांच्याच होत असलेल्या विरोधामुळे धनंजय मुंडे यांचे मंत्रीपद धोक्यात आल्याचे दिसत आहे. राज्यपाल सीपी सुब्रमण्यम यांची भेट घेत बीडमधील विद्यमान परिस्थितीची माहिती तसेच वाल्मिक कराड यांच्या दहशतीची आणि त्यांच्याकडून करण्यात येत असलेल्या अवैध धद्यांची आणि गुंडगिरीची माहिती त्यांना देण्यात आली. तसेच मस्साजोगचे सरपंच संतोश देशमुख यांच्या हत्याच्या कथित कहाण्याही यावेळी राज्यपालांच्या कानावर घालत विद्यमान मंत्रिमंडळातील मंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यातील संबधही यावेळी दाखवून देण्यात आले. त्यामुळे धनंजय मुंडे यांना एक तर बिनखात्याचा मंत्री करावे किंवा धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी या सर्वपक्षिय आमदार, नेत्यांकडून राज्यपालांकडे करण्यात आली. सर्वपक्षिय नेत्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची जी हत्या करण्यात आली. ही माणूसकीची हत्या आहे. या प्रकरणातील एक आरोपी अद्याप फरार आहे. वाल्मिक कराड याच्यावर जे गुन्हे दाखल झालेले आहेत त्या गुन्ह्यातून तो सहज बाहेर पडू शकतो. त्यामुळे त्याच्या विरोधात ३०५ कलमातंर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली. पुढे बोलताना संभाजी छत्रपती म्हणाले की, या सगळ्याचा मास्टरमाईंड धनंजय मुंडे आहेत. त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे. लोकांचा आक्रोश असताना अंतुले, आर आर पाटील, मनोहर जोशी, अशोक चव्हाण यांनी राजीनामा दिला होता. क्लिन चीट मिळाल्यानंतर पुन्हा ते या पदावर विराजमान झाले. मग अजित पवार हे धनंजय मुंडे यांना संरक्षण का देत आहेत असा सवालही यावेळी त्यांनी केला. शेवटी संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, याप्रकरणी राज्यपालांनी लक्ष्य घालण्याचे आश्वासन दिले आहे. हा महाराष्ट्र शिवाजी महाराज आणि शाहु महाराजांचा महाराष्ट्र आहे. हा संताचा महाराष्ट्र आहे. त्यामुळे ज्या गोष्टी महाराष्ट्रात घडत आहेत त्या दुर्दैवी आहेत. हा विषय सुद्धा अनेक ठिकाणी मराठा विरूद्ध वंजारी अशा मार्गावर गेला आहे. मात्र हा विषय मराठा विरूद्ध वंजारी असा नाही. दलित समाजाच्या मुलाला वाचवायला संतोष देशमुख गेला होता असेही यावेळी त्यांनी सांगितले. तर जितेंद्र आव्हाड म्हणाले की, हे प्रकरण गुंडागर्दी दहशतीचे प्रकरण आहे. त्यामुळे याप्रकरणी धनंजय मुंडे यांचा राजीनामा अजित पवार यांनी घ्यावा अशी मागणी केली. तसेच ज्या अर्थी शरद पवार यांनी याप्रकरणी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे यावरून हे प्रकरण किती गंभीर आहे हे यावरून दिसून येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

------------

### शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी

विविध योजना अंमलात आणल्या जातात. योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी शासनस्तरावर सतत प्रक्रिया सुरू असते. लोकप्रतिनिधी म्हणून आम्हीदेखील याविषयी पाठपुरावा करत असतो. मात्र या योजना अधिकाधिक गरजूंपर्यंत पोहचवण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून प्रभावी आणि नवनवीन पध्दतीने लाभार्थ्यांपर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यामुळे योजनांची अंमलबजावणी करणार्या यंत्रणांनी समिती गठीत करावी. तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांनी गावागावांमध्ये जाऊन कॅम्प घ्यावेत. या कॅम्पमध्ये संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी त्यांच्या विभागांच्या योजनांबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे, तसेच त्यांना येणार्या अडीअडचणी सोडविण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना सूचित करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड आणि शिरूर कासारचे तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले आहेत. याबाबत आ.क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

---------

### छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्याच्या

आणि विजापूरचे संयुक्त ऑपरेशन पूर्ण करून परतत असताना विजापूर जिल्ह्यातील कुत्रु-बेद्रे रस्त्यावर नक्षलवाद्यांनी हा घातपात केला. नक्षलवाद्यांनी कुत्रू पोलीस स्टेशन हद्दीतील आंबेली गावाजवळ दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी आयईडीचा स्फोट करून सुरक्षा दलाचे वाहन उडवले. यामध्ये ८ दंतेवाडा डीआरजी जवान आणि एक चालक हे शहीद झाले.

----------

### एचएमपीव्हीचा भारतात

आढळल्याने अहमदाबादच्या चांदखेडा परिसरात असलेल्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. चाचणी केल्यानंतर मुलाला एचएमपीव्हीची लागण झाल्याचे आढळून आले. अर्भकाला आयसोलेशनमध्ये ठेवण्यात आले आहे.

**आरोग्य मंत्रालय सतर्क**

मंत्रालयाने सांगितले की, परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. आयएमसीआर वर्षभर एचएमपीव्ही प्रचलित ट्रेंडचे निरीक्षण करणे सुरू ठेवेल. मात्र, जागतिक आरोग्य संघटना आधीच चीनमध्ये करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती देत आहे. याबाबत सर्व आरोग्य विभाग सतर्क आहेत. कर्नाटकच्या आरोग्यमंत्र्यांनी तातडीची बैठक बोलावली आहे.

**ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) म्हणजे काय?**

ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस, ज्याला एचएमपीव्ही देखील म्हणतात, हा एक विषाणू आहे जो मानवी श्वसन प्रणालीवर परिणाम करतो. हे २००१ मध्ये पहिल्यांदा ओळखले गेले. त्यानंतर नेदरलँडच्या शास्त्रज्ञांनी याचा शोध लावला आहे. श्वसन विषाणूंप्रमाणे, ते खोकताना आणि शिंकताना संक्रमित लोकांच्या जवळ राहून देखील पसरतात. गेल्या सहा दशकांपासून हा विषाणू जगात अस्तित्वात असल्याचा दावा काही अभ्यासांमध्ये करण्यात आला आहे.

**एचएमपीव्हीचा कोणाला आणि किती प्रमाणात परिणाम होतो?**

याचा प्रामुख्याने मुलांवर परिणाम होतो. तथापि, कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांवर आणि वृद्धांवर देखील त्याचा प्रभाव नोंदविला गेला आहे. या विषाणूमुळे लोकांना सर्दी, खोकला, ताप आणि कफ येण्याची तक्रार होऊ शकते. अधिक गंभीर प्रकरणांमध्ये, घसा आणि श्वसनमार्गाच्या अडथळ्यामुळे लोकांच्या तोंडातून शिट्टीचा आवाज देखील ऐकू येतो. काही अधिक गंभीर प्रकरणांमध्ये, या विषाणूमुळे लोकांना ब्रॉन्कायलाइटिस (फुफ्फुसात ऑक्सिजन वाहून नेणाऱ्या नळ्यांचा जळजळ) आणि न्यूमोनिया (फुफ्फुसात पाणी भरणे) याचा त्रास होऊ शकतो. यामुळे संक्रमित लोकांना रुग्णालयात दाखल करावे लागू शकते.

**लक्षणे काय आहेत?**

या आजाराचे लक्षणे सामान्यच आहे. ताप येणे, खोकला, नाक बंद होणे, घशात घरघर होणे किंवा खवखवणने, श्वास घेण्यास त्रास होणे, अस्वस्थ वाटणे आदी या आजाराची लक्षणे आहेत. हा आजार झाल्यास गंभीर प्रकरणात ब्रोंकाइटिस किंवा न्यूमोनिया होण्याची शक्यता असते.

----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि.०७ जानेवारी २०२५



## डिजिटल मिडीया पत्रकार संघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी अमोल राऊत

मंठा (प्रतिनिधी ) मंठा तालुक्यातील तळणी येथील पत्रकार अमोल राऊत यांची डिजिटल मिडिया संपादक पत्रकार महाराष्ट्र संघटनेच्या जालना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी छत्रपती संभाजीनगर येथे ४ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन



सन्मानित केले. यावेळी राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत , पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले व राज्यसभा इकबाल शेख यांची उपस्थिती होती. ग्रामीण भागातील डिजीटल मीडिया क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांना मदत होण्याबरोबरच या माध्यमाला सामाजिक मूल्य तसेच सामाजिक जबाबदारीच्या चौकटीत कार्यरत राहुन संघटनेची ध्येय, धोरणे तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. अमोल राऊत हे मागील अनेक वर्षापासून पत्रकारिताक्षेत्रात कार्यरत असून एक अभ्यासू पत्रकार म्हणून त्यांची जिल्ह्यात वेगळी ओळख आहे. त्यांची ही निवड ३१ डिसेंबर २५ पर्यंत असणार आहे. या निवडीबद्दल अमोल राऊत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी राजकिशोर मोदी यांची निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी प्रदेश अध्यक्ष राजकिशोर मोदी यांची सर्वानुमते बिनविरोध पणे निवड करण्यात आली आहे. मागील महिन्यात ओंकारेश्वर येथे अखिल भारतीय सर्ववर्गीय जायसवाल महासभेची बैठक संपन्न झाली होती . या बैठकीत महाराष्ट्रासह देशभरातून जायसवाल बांधव सहभागी झाले होते. या बैठकीत मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची निवड समिती गठीत करून यातून सर्वांनी विचार विनिमय व चर्चा करून एकमताने राजकिशोर मोदी यांची आगामी २०२५ ते २०२८ या काळासाठी जायसवाल महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे अशोक जायसवाल यांच्या वतीने जाहीर करण्यात आले.



अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे सध्या अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळला आहे. महाराष्ट्र प्रदेश जायसवाल संघटनेच्या अध्यक्ष पदाची जवाबदारीही राजकिशोर मोदी हे लिलया सांभाळत आहेत. त्यांनी प्रदेशअध्यक्ष पदाच्या कालखंडात समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांचे शैक्षणिक , सामाजिक तसेच आर्थिक क्षेत्रात देखील मोठे योगदान आहे. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक, श्री योगेश्वरी मल्टिस्टेट, श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था, त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाचे उपाध्यक्ष म्हणून करत असलेल्या कार्याची दखल व समाजासाठी कार्य करण्याची धडपड लक्षात घेऊन त्यांना सर्वानुमते राष्ट्रीय अध्यक्ष पदावर नियुक्त करण्याचे ठरवून त्यांना तशी संधी देण्यात आल्याचे एकमुखाने झाल्याचे जाहीर करण्यात आले. राजकिशोर मोदी यांनी आपल्या आजपर्यंत च्या कालखंडात महासभेच्या अनेक ठिकाणी बैठका व सामाजिक उपक्रम घेऊन समाज पुढे नेण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत. यापुढेही त्याचप्रमाणे समाजासाठी सदैव कार्यतत्पर राहनार असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली.

अंबाजोगाई शहरात आगामी काळात अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे राष्ट्रीय महाअधिवेशन संपन्न होणार असून यामध्ये मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्याकडून राजकिशोर मोदी यांचा पदग्रहण व शपथ ग्रहण सोहळा देखील संपन्न होऊन ते २०२५ ते २०२८ पदासाठी महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेऊन महासभेच्या कार्यभार सांभाळनार आहेत. राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात समाजातील तरुण तरुणींना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांना प्रेरित करण्यात येणार असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सांगितले. त्याचबरोबर समाजातील सर्व वर्गीय घटकांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. राजकिशोर मोदी यांची राष्ट्रीय अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्याचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होऊन त्यांना पुढील काळासाठी शुभेच्छा प्राप्त होत आहेत.

# देवदहिफळच्या तुळजाभवानी मंदिरात संत चरित्रकथा व भव्य कीर्तन महोत्सव

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र देव दहिफळ येथे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिर, मोहखेड रोड येथे संत चरित्र कथा व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शाकंभरी नवरात्र उत्सव आणि जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज सदैह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवाच्या निमित्ताने श्री तुळजाभवानी प्रतिष्ठानने या भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.**



धारूर तालुक्यातील श्री क्षेत्र देव दहिफळ शिवारात मोहखेड रोडवरील कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ०६ जानेवारी २०२५ ते १३ जानेवारी २०२५ या कालावधीत हा सोहळा संपन्न होणार आहे. सकाळी ७ ते १० गुरुचरित्र पारायण ,१० ते १२ सामुदायिक राम कृष्ण हरी नाम जप व दुपारी १ ते ४ हभप.विष्णुकांत महाराज रासवे वांगी संस्थान यांच्या मुखातुन संत चरित्र कथा सादर केली जाईल. उध्दव कोथींबिरे, सुशन काशीद, शंकर फाटे, गोरख सवासे, बिभीषण मायकर हे कथेला संगीत साथ करतील.

दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत संत ज्ञानोबाराया वारकरी शिक्षण संस्थान दिंद्रुड येथील विद्यार्थी व भजनी मंडळ याचा हरिपाठ होईल. रात्री ८ ते १० या वेळेत महाराष्ट्रील वारकरी संप्रदायातील निरपेक्ष भावनेने सेवा करणारी किर्तकार मंडळीची हरी कीर्तन सेवा होइल. या सोहळ्यासाठी परीसरातील गायक - वादक मंडळी दररोज निरपेक्ष भावनेने विनामूल्य सेवा देतात. असतात. श्री गुरु मुक्तीरामभाऊ वारकरी शिक्षण संस्थान, आमला येथील विद्यार्थ्यांच्या सहभागातून दि.१३ रोजी सकाळी भव्य दिंडी सोहळा पार पडणार आहे. सप्ताहभरात ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज सोळंके, भागवताचार्य दत्ता महाराज सोनवणे, वारकरी भुषण हभप योगेश महाराज कानगावकर, हभप पांडुरंग महाराज मुंडे, हभप.विठ्ठल महाराज मंत्री, भक्तीनिष्ठ हभप.शंकर महाराज मराठे (भामचंद्र डोंगर), ह.भ.प.हनुमान महाराज आवलगावकर यांची किर्तनसेवा होणार आहे. सोमवार दि.१३ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज श्री गुरु पुंडलिक महाराज देहुकर यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर संत सेवकांचा सन्मान सोहळा आणि महाप्रसाद संपन्न होणार असल्याचे संयोजक बाळासाहेब रामदास डांगे यांनी सांगितले.



## संचालक माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि. ०६ : ‘दर्पणकार’ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना पत्रकार दिनानिमित्त संचालक माहिती कार्यालयात सहायक संचालक गणेश फुंदे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी संचालक (माहिती) कार्यालयातील कर्मचारी प्रविण भानेगावकर, संजय परदेशी, राजेंद्र वाणी, प्रकाश राऊत, प्रतिक्षा शेजूळ, दशरथ वानोळे, इंदुबाई गावंडे, पांडुरंग जाधव, राहुल तोणगिरे, शेख अब्दुल रहेमान, अनिल बिरोटे, अशोक सुरडकर, गणेश सुरासे यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

# विभागीय लोकशाही दिनाचे १३ जानेवारी रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी १३ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तसेच नियमित विभागीय लोकशाही दिन संपल्यानंतर विभागीय माहिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. विहित नमुना अर्ज प्रप्रत्र-१ (क) आवक शाखेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. विभागीय महिला लोकशाही दिनासाठी पिडीत महिलांनी विहीत नमुन्यातील मुदत पुर्व अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, तथा सदस्य सचिव यांच्याकडे सादर करता येणार आहे.अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही.जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# समाजाची नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या लिखाणातून निर्माण होते-जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

जालना । प्रतिनिधी

मराठी पत्रकार दिनानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयातीत सभागृहात आज आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशाच्या जडण-घडणीत वृत्तपत्र माध्यमांची नेहमीची महत्वाची भूमिका राहिलेली आहे. पत्रकारिता हे लोकशिक्षण व समाजशिक्षणाचे एक महत्वाचे माध्यम देखील आहे त्यामुळे पत्रकारीतेला चौथा स्तंभ ही उपमा देण्यात आलेली आहे. समाजाच नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या लेखणीतून निर्माण होत असते. आज पत्रकारितेच्या माध्यमातून आपणांस जगातील सर्व घडामोडींची माहिती तात्काळ मिळते. लोकशाही प्रणालीमध्ये सकारात्मक आणि नकारात्मक बातमीचे वस्तुनिष्ठ लेखन करणारा पत्रकार अत्यंत महत्वाचा घटक आहे. पत्रकार समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळेच समाजाची जडण घडण होण्यास पत्रकार महत्वाची भूमिका पार पाडतात. पत्रकार हा प्रतिकुल परिस्थितीत निर्भिडपणे आपले कार्य करत समाजा दैनंदिन सर्व घडामोडी पोहचविण्याचे काम करतो. यापुढेही पत्रकारांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची समाजामधील विश्वासार्हता जोपासत आपले कार्य करावे, असे सांगून डॉ. पांचाळ यांनी मराठी पत्रकार दिनाच्या सर्व पत्रकारांना पुष्प भेट देवून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी प्रशासन आणि पत्रकार यामधील दुवा म्हणून माहिती कार्यालय काम करते. प्रशासनाच्या दैनंदिन होणाऱ्या उपक्रमामध्ये पत्रकारांची नेहमी महत्वाची भूमिका असून, त्यांचे नेहमी सहकार्य होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी, यांच्यासह जिल्ह्यातील संपादक, पत्रकार बांधवांची प्रमुख उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून दर्पणदिन साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने दरवर्षी दर्पण दिन अर्थात पत्रकार दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत असतो त्या अनुषंगाने याही वर्षी जिल्हा परिषद शाळा भिमनगर येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार इद्रिस चाऊस व बबन उकांडे हे होते.**



आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहीले नियतकालिक दर्पण सुरू केले होते.याचे स्मरण म्हणून ६ जानेवारी हा दिवस दर्पण दिन अर्थात पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो.पाटोदा मराठी पत्रकार परिषद नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहून समाजाचे प्रश्न लेखनीच्या माध्यमातून मांडत असतानाच केवळ लेखनीतुन समाजाचे प्रश्न सुटणार नाही या उध्दात हेतुने सामाजिक कार्यात अग्रस्थानी राहून आरोग्य शिबीर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण,विविध परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप म्हणून सत्कार सोहळे आदी उपक्रम राबविले जातात याच अनुषंगाने ६ जानेवारी सोमवार रोजी दर्पण दिनानिमित्त जि.प.शाळा भिमनगर तसेच जि.प.उर्दु शाळा अरबगल्ली येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत साजरा करण्यात आले.तसेच जेष्ठ पत्रकार इद्रिस चाऊस, बबन उकांडे, अब्दुल कादर मकराणी आदींचे यथोचित सत्कार करून सन्मान करण्यात आले. यावेळी पत्रकार संजय सानप यांना बीड पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्तावित हमीदखान पठाण यांनी केले तर पाटोदा शाखेचे अध्यक्ष अजय जोशी यांनी मार्गदर्शन करतांना पत्रकारांच्या अडचणी तसेच शासनाकडे पत्रकार भवन तसेच पत्रकारांना वसाहत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगितले यावेळी अजय जोशी, प्रा.खंडागळे, हमीदखान पठाण,संजय सानप, भाऊसाहेब पवार,बबन उकांडे, इद्रिस चाऊस, जावेद शेख,आशोक भवर,नानासाहेब डिडुळ,हरिदास शेलार, बबन पवार, सचिन गायकवाड, गोकुळ इंगोले,महेश बेंद्रे, महेशर पटेल,फय्याज सय्यद,सतिष गर्जे,गणेश शेवाळे, बंडू डिडुळ आदी पत्रकार उपस्थित होते..

# नवविकास मंडळ एक ध्येयवादी संस्कार केंद्र-प्राचार्य सोमनाथ रोडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सध्याच्या काळात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बाजारीकरण झाले असून या परिस्थितीत साने गुरुजींच्या मानवतावादी विचारांवर मार्गक्रमण करणारी नवविकास मंडळ शिक्षण संस्था एक ध्येयवादी संस्कार केंद्र आहे असे प्रतिपादन मराठवाडा जनता विकास परिषदेचे उपाध्यक्ष तथा प्राचार्य सोमनाथ रोडे यांनी केले.**




मराठवाडा जनता विकास परिषद शाखा बीड आयोजित युवक विकास परिषदेत मार्गदर्शन करताना श्री.रोडे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख तर प्रमुख व्यक्ते संपादक शिरीष देशमुख,सहसचिव सुमंत गायकवाड, प्रा.अर्जुन जाधव, सोमेश्वर वाघमारे, मुख्याध्यापक ए. आर.ईबीते यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य रोडे म्हणाले की,नवविकास मंडळात कर्मचारी नेमणूक व विद्यार्थी प्रवेशात कुठलेही अर्थकारण होत नाही ही बाब आजच्या काळात संपूर्ण शिक्षण क्षेत्रासाठी भूषणावह आणि आदर्शवत असून याचे श्रेय संस्थेचे कार्यवाह माजी आ.डी.के.देशमुख यांच्या मूल्याधिष्ठित विचारांना द्यावे लागेल.याप्रसंगी त्यांनी विकास परिषदेच्या युवक विकास समितीची घोषणा करताना संपादक शिरीष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सहसचिव सुमंत गायकवाड,गणपत सोंदळे यांची निवड या समितीवर करण्यात आली. प्रत्येक महाविद्यालयात लवकरच युवक विकास परिषदेचे आयोजन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात माजी आमदार डी.के.देशमुख यांनी युवक संवाद मेळाव्याचा हा श्रीगणेशा असून येत्या काळात ही मोठी चळवळ निर्माण होईल असा विश्वास व्यक्त केला. या युवक विकास परिषदे करिता जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह विकासप्रिय नागरिक, विकास परिषदेच्या सर्व सदस्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी राजाराम शिवणकर,ग.वा. मुळाटे, किरण देशमुख, राजाभाऊ शेळके, मधुकर किर्ते यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## योगेश्वरी कन्याशाळेच्या सुवर्ण

आले . पाहुण्यांनी विज्ञान केंद्र व मुलींच्या व्यायामशाळेलाही भेट दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते . प्रमुख पाहुण्याम्हणून सुप्रसिद्ध अभिनेत्री व मराठी शाळांची सदिच्छा दूत चिन्मयी सुमित , प्रसिद्ध गायिका मधुवंती साने , डॉ क्षमा देवशेटवार (पुणे) उपस्थित होत्या . व्यासपीठावर संस्थेचे पदाधिकारी गणपत व्यास, ॲड .जगदीश चौसाळकर , कमलाकर चौसाळकर , प्रा .माणिकराव लोमटे, प्रा भिमाशंकर शेटे, लंकेश वैद्य , सय्यद पाशू मिया , अंगद कराड, रमण सोनवळकर , डॉ . जयश्री मोटेगावकर , ॲड . कल्याणी विर्धे प्रा. अभिजीत लोहिया , प्रा. गोळेगावकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात व्यासगुरूजी लिखीत संस्थागीत व दिपप्रज्वलन करून करण्यात आली . शिवनंदा घोडके मॅडम व त्यांचा गीतमंच यांनीही स्वागतगीत सादर केले .या प्रसंगी माजी विद्यार्थीनी डॉ क्षमा देवशेटवार , मधुवंती साने यांनी आपले मनोगत व्यक्त केले . संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा समन्वयक ॲड . कल्याणी विर्धे मॅडम यांनी मांडला .प्रमुख पाहुण्या चिन्मय सुमित यांनी आपल्या मार्गदर्शनात मराठी शाळा व मातृभाषेतून शिक्षण याचे महत्त्व पटवून देत स्वतः सक्षम कसे बनवावे , स्वतःला कधीही कमी समजू नये ,आपल्याला जी बाब आवडत नाही त्याला नाही म्हणायला शिकावे असे सर्वतोपरी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांचे ,शंकाचे हसत-खेळत निरसन केले .तर उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ , प्राचार्य कविता गित्ते (कराड) , डॉ माधवी दबडे यांची प्रकट मुलाखत डॉ . संपदा कुलकर्णी यांनी घेतली . माजी विद्यार्थीनी व शिक्षिकांनी लिहिलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . मधुवंती साने यांनी सुमधूर भजनावली सादर केली .

सेवानिवृत्त शिक्षिका, मुख्याध्यापिका एस . के . कराड मंगल भुसा, शंकुतला कुलकर्णी, यशोदा राठोड, मंगला लोखंडे , संगीता मुकदम, शैलजा मुळजकर, , श्रीमती दळवी, श्रीमती निळेकर , मोहन कुलकर्णी व्हि.एल. कोटुरवार यांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला .

प्रारंभी सहसचिव डॉ. जयश्री मोटेगावकर यांनी प्रास्ताविक केले . शालेच कामकाजाची माहिती मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी यांनी दिली . पाहुणांचा सत्कार पर्यवेक्षिका स्मीता धावडकर, लता सरवदे, प्रतिभा देशमुख (कुलकर्णी ), अंजली रेवडकर, मंगल कोमटवार, आशा फुलारी, तारा देशपांडे , जीजा गवळे यांनी केला . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किर्ती बेदरकर व शारदा मुंडे यांनी केले तर पाहुण्यां चा परिचय आरती जवळबळकर यांनी केला . प्रतिनिधिक स्वरूपात माजी शिक्षिका व विद्यार्थीनींनी ही मनोगत व्यक्त केले .शानदार सांस्कृतिक कार्यक्रम शाळेच्या आजी विद्यार्थीनींनी केला त्याचे सुत्रसंचलन अनिता लोंढे यांनी केले . शेवटी उपमुख्याध्यापिका ज्योती मळेकर व कार्यक्रमाच्या संयोजिका व पर्यवेक्षिका स्मिता धावडकर यांनी सर्वांचे आभार मानले . सर्व शिक्षक , शिक्षीका , शिक्षकेत्तर कर्मचारी व आजी , माजी विद्यार्थीनी शिक्षक ,शिक्षिका, व पालक वृंद यांच्या भरभरून प्रतिसादात सांस्कृतीक कार्यक्रमाने सांगता समारंभ पार पडला.

## जिल्हा माहिती कार्यालयात मराठी

येणाऱ्या काळात पत्रकारांची आरोग्य तपासणी करणे तसेच त्यांच्या रक्तगट नोंदवही चे काम करणे आदीबाबतही यावेळी चर्चा झाली.

यावेळी पत्रकार सुनिल क्षीरसागर, संपादक वैभव स्वामी, विलास डोळसे, साहस आदोडे, अविनाश कुलकर्णी, संजय हंगे, मंगेश निटूरकर, सुभाष चौरे,विशाल साळुंके, प्रचंड सोळंके, राजेंद्र होळकर, शेखरकुमार, श्रीमती आयशा शेख ,सर्जेराव देशमुख, जाधव, सतीश केजकर, छायाचित्रकार लक्ष्मन नरनाळे, लक्ष्मन गायकवा इत्यादी पत्रकार, छायाचित्रकार उपस्थित होते. जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी वरिष्ठ लिपिक श्रीमती बी.जी. अंबिलवादे, सहाय्यक छायाचित्रकार, एकनाथ मुजमुले, लिपिक टंकलेखक श्रीमती रेवती लाबडे, लिपिक टंकलेखक सावता गुंजाळ, वाहन चालक, दिपक पवार, शिपाई छगन कांडेकर. आदींची देखील या कार्यक्रमास उपस्थिती होती.

## पत्रकार संजय सानप

पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आली आहे. या पुरस्काराबद्दल पत्रकार संजय सानप यांचे अभिनंदन दैनिक लोकाशाचे संपादक विजयराज बंब, महा सांगवी येथील संस्थानच्या मठाधिपती महंत आईसाहेब ह भ प राधाताई सानप महाराज, महाराष्ट्र राज्य मुप्टा असोसिएशनचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष आणि लेखक निवेदक प्रा.बिभिषण चाटे, पाटोदा तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण शिंदे पाटील. पत्रकार हमीद खान पठाण समाजसेवक गणेश ढवळे सर जावेद भाई शेख अशोक भवर अनिल गायकवाड सचिन पवार भाऊसाहेब पवार यशवंत सानप खंडागळे सर पत्रकार महेश बेंद्रे श्रीरंग लांडगे हरिदास शेलार सतीश गर्जे.गणेश शेवाळे आदी सह विविध राजकीय सामाजिक धार्मिक वैचारिक क्षेत्रातील समाजधुरीनांनी केले आहे.

Daily Rajya Loktantra Date_07-01-2025

**CHANGE IN NAME**

MY FATHER'S OLD NAME WAS
1) KAILAS HABBU RATHOD
2) KAILAS RATHOD
NOW MY FATHER'S NEW NAME KAILASH HABBU RATHOD
ADDRESS
RAMNAGAR TANDA. TQ. AMBAD. DIST. JALNA (431204) 7666861796

Daily Rajya Loktantra Date_07-01-2025

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME WAS
1) MANOJ KAILAS RATHOD
2) MANOJ RATHOD
NOW MY NEW NAME MANOJ KAILASH RATHOD
ADDRESS
RAMNAGAR TANDA. TQ. AMBAD. DIST.JALNA (431204) 7666861796

Daily Rajya Loktantra Date_07-01-2025

**CHANGE IN NAME**

MY MOTHER'S OLD NAME WAS
1) KAMAL KAILAS RATHOD
2) KAMAL RATHOD
NOW MY MOTHER'S NEW NAME KAMAL KAILASH RATHOD
ADDRESS
RAMNAGAR TANDA. TQ. AMBAD. DIST.JALNA (431204)
7666861796

cmyk

# गायीच्या दूध खरेदी दरात १ रुपयांनी वाढ

## राज्यातील सहकारी, खासगी दूध संघांचा निर्णय

पुणे : देशांतर्गत बाजारपेठेत दूध पावडर आणि बटरच्या किंमतीत वाढ झाली आहे. दरम्यान, राज्यातील सहकारी आणि खासगी दूध संस्थांनी गाय दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रूपयांची वाढ केली आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ आणि वारणा या दोन दूध संघांनी वाढ केली नाही. ज्या दूध संघांनी दरवाढ केली आहे, त्या दूध संघांकडून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफसाठी प्रतिलिटर तीस रुपये दर दिला जाणार आहे. यापूर्वी गोकुळ आणि वारणा दूध संघाने दर वाढवून दिल्याने त्यांनी खरेदी दरात वाढ केली नाही.

फेब्रुवारी महिन्यात दुधाबरोबरच पावडर व बटरची मागणी वाढते. याचा अंदाज घेऊन दूध खरेदी दरात वाढ होते. मागील वर्षभरापासून गाय दूध उत्पादकांचा दरावरून मोठा संघर्ष सुरू आहे. येत्या महिन्याभरात दूध दरात वाढ अपेक्षित आहे. शासनानेही १ डिसेंबरपासून गाय दूध अनुदान बंद केल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागले



आहे. दूध संघांनी दरात वाढ करावी अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे. त्यात, गेल्या महिन्याभरापासून देशांतर्गत बाजारपेठेत दूध पावडर व बटरच्या दरात थोडीसी वाढ झाल्याने संघांनी खरेदी दरात वाढ करायचा निर्णय घेतला आहे. विधानसभा निवडणुका होताच पश्चिम महाराष्ट्रातील गोकुळ, वारणा, राजारामबापू या सहकारी दूध संघांनी गाय दूध खरेदी दरात ३ रुपयांची कपात केली. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच दूध संघांनी खरेदी दरात कपात केल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे.

सांगली जिल्ह्यातील आमदार जयंत पाटील यांच्या ताब्यात असणाऱ्या राजारामबापू दूध संघ, गोकुळ, वारणा, भारत डेअरीसह दूध संघांचे प्रतिनिधी यांनी ही बैठक बोलवून हा निर्णय घेतला होता. राज्य शासनाने ऑक्टोबर २०२४ पासून गाय दूध खरेदीचा ३.५ फॅट व ८.५ एस.एन.एफ. करिता किमान प्रतिलिटर २८ रुपये निश्चित केला आहे. महाराष्ट्रात इतर संघ २७ ते २८ रुपये दराने गाय दूध खरेदी करीत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक दूध संघ ३३ रुपये दर देत होते.

# हायड्रोपोनिक्स शेतीमध्ये कीटक आणि रोगांचे व्यवस्थापन



हायड्रोपोनिक्स तंत्रात वनस्पतींची लागवड मातीऐवजी पाण्याद्वारे केली जाते. सध्या अनेकजण हायड्रोपोनिक्स तंत्राचा वापर करताना दिसत आहेत. या तंत्रात झाडांना लागणारी सर्व पोषक द्रव्ये पाण्याद्वारे दिली जातात. हे एक अतिशय चांगले आणि उदयोन्मुख शेती तंत्र आहे. अशा स्थितीत या शेती पद्धतीत झाडांच्या मुळांमध्येही विविध प्रकारचे रोग होतात आणि पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होतो. हायड्रोपोनिक्स शेतीमध्ये कीटक आणि रोगांचे व्यवस्थापन कसे करावे? याबद्दल माहिती घेतल्यास नुकसान टाळता येते.

१) कोळीचा प्रादुर्भाव :हायड्रोपोनिक्स शेती करताना कोळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात जाणून येतो. हे कोळी कोरड्या वातावरणात वाढतात. त्यांचे रंग लाल, पिवळे, हिरवे आणि काळा आहेत. हे कोळी झाडाचे देठ खातात आणि त्या झाडाच्या देठातील सर्व रस पिळून काढतात. याशिवाय झाडाच्या पानांवरही हल्ला करून ते खाण्यास सुरुवात करते. त्यामुळे आपल्या पिकाचे मोठे नुकसान होते.

२) पावडर बुरशी : हा रोग फक्त हायड्रोपोनिक्स वनस्पतींमध्ये होतो. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते आणि त्यांची देठं कमकुवत होऊ लागतात. याच्या वापरामुळे झाडांची पाने सुकायला लागतात आणि संपूर्ण झाड पिवळी पडते. या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास झाडांची योग्य प्रकारे वाढ होत नाही. त्यामुळे उत्पादन कमी होऊन शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो.

३) थ्रिप्स : हायड्रोपोनिक्स शेती करताना थ्रिप्स रोगाचा प्रादुर्भाव देखील आढळून येतो. हा एक लहान आणि गोल आकाराचा कीटक आहे. या काळ्या रंगाच्या किडीचा झाडांच्या पानांवर परिणाम होतो आणि तो हळूहळू संपूर्ण झाडावर पसरतो. याचा प्रादुर्भाव झाल्यावर झाडांची पाने नष्ट होण्यास सुरवात होते. त्याचबरोबर हायड्रोपोनिक्स तंत्राने उगवलेल्या बहुतेक वनस्पतींमध्ये लोहाची कमतरता असते. त्याच्या कमतरतेमुळे, पानांमध्ये क्लोरोफिल विकसित होत नाही आणि त्यांचा रंग पिवळा होऊ लागतो.रोगांपासून पिकाला वाचवण्यासाठी उपाय : वरील रोगांचा पिकांवर प्रादुर्भाव झाल्यावर आपले पीक नष्ट होण्याची शक्यता असते. त्यामुळे आपण त्याचे योग्य ते व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. या रोगांपासून बचाव करण्यासाठी झाडांमध्ये नेहमी स्वच्छ पाण्याचा वापर करा आणि आपल्या सभोवतालचे वातावरण स्वच्छ ठेवा. झाडांच्या वाढीसाठी चांगला प्रकाश देखील आवश्यक असतो आणि उच्च आर्द्रता असलेल्या वातावरणामुळे कीटकांची वाढ होण्यास मदत होते. असे केल्यास तुमचे पीक रोगांपासून दूर राहील आणि तुम्हाला चांगले उत्पादन मिळेल.

# गव्हाची आंतरमशागत अन् पाणी व्यवस्थापन

पाणी व्यवस्थापन : भारी जमिनीकरिता १८ दिवसांच्या अंतराने ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. मध्यम जमिनीसाठी १५ दिवसाच्या अंतराने ७ पाळ्या द्याव्यात तर हलक्या जमिनीस १०-१२ दिवसाच्या अंतराने ८ ते १० पाळ्या द्याव्यात. परंतु पीक वाढीच्या महत्वाच्या अवस्था व या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनावर परिणाम होतो.



मुकुटमुळे फुटण्याच्या वेळी (पेरणीनंतर २१-२५ दिवसांनी): या वेळी जमिनीत पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे मुकुटमुळे कमी फुटतात. फुटलेल्या मुळ्या जास्त पसरत नाहीत. फुटवे कमी येतात. गहू काढणीस लवकर येतो व उत्पादनात घट येते. फुटवे फुटण्याची अवस्था (पेरणी नंतर ५५-६० दिवसांनी): ओंब्या कमी बाहेर पडतात. बाहेर पडलेल्या ओंब्यांची लांबी कमी होते व पर्यायाने उत्पादनात घट येते.

पीक फुलोरयास येणे (पेरणी नंतर ७०-८०- दिवसांनी): परागसिंचन कमी होऊन दाण्याची संख्या घटते व पर्यायाने उत्पादन घटते.

दाण्यात चिक भरण्याची वेळ (पेरणीनंतर ९०-१०० दिवसांनी): या अवस्थेत दाणे पोसतात, त्यांचा आकार वाढतो. परंतु जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार लहान होतो व वजन कमी होते.

दाणे टणक होण्याची अवस्था (पेरणी नंतर ११० दिवसांनी): या अवस्थेत जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार कमी होतो.दाण्यांवर सुरकुत्या पडून प्रत निकृष्ट होते व पर्यायाने उत्पादनात घट येते.

ज्या शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध नाही अशा परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. पाणी अपुरे असल्यास व एक ते पाच पाण्याच्या पाळ्या देणे शक्य असल्यास पुढील प्रमाणे पाणी द्यावे. चार पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी २१ ते २५ दिवसांनी, दुसरे ५५-६० दिवसांनी तर तिसरे ७०-८० दिवसांनी दयावे तर चौथे पाणी ९०-१०० दिवसांनी द्यावे.

आंतरमशागत : पेरणी नंतर २१-३० दिवसांनी एक खुरपणी आणि कोळपणी करून तणांचा बंदोबस्त करावा. गव्हात चांदवेल, हरळी यासारख्या तणांचा प्रादुर्भाव होतो, त्याकरिता जरुरी प्रमाणे एक किंवा दोन खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी करावी. गहू पिकातील अरुंद पानांचे आणि रुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी दर हेक्टरी आयसोप्रोटयुरॉन (५०%) दोन ते तीन किलो किंवा मेटासल्फूरॉन मेथाईल (२०%) हेक्टरी २० ग्रॅम किंवा २,४- डी (सोडियम) अधिक २% युरिया ६०० ते १२५० ग्रॅम ६०० ते ८०० लिटर पाण्यातून मिसळून गव्हाच्या दोन ओळीत फवारावे. तणनाशक फवारल्या नंतर १० ते १२ दिवस पाणी देवू नये. तणनाशकाच्या फवारणीसाठी फ्लॅटफॅन किंवा फ्लडजेट नोझल वापरावे.तसेच फवारणीसाठी साधा नॅपसॅक पंप वापरावा.पॉवर स्प्रे वापरू नये.

बागायती वेळेवर पेरलेल्या गव्हास खुरपणी झाल्यानंतर (सर्वसाधारणपणे २१-३० दिवसांनी) प्रती हेक्टरी ६० किलो नत्र (१३० किलो युरिया), बागायती उशिरा पेरलेल्या गव्हास प्रती हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) द्यावा. पीक ५५ ते ७० दिवसांचे असताना १९:१९:१९ या विद्राव्य खताची दोन वेळा फवारणी करावी. (१० लिटर पाण्यात ५० ग्रॅम १९:१९:१९)

दाणे भरण्याच्या अवस्थेत दोन टक्के युरियाची फवारणी करावी. (१०लि. पाण्यात २०० ग्रॅम युरिया).

# बटाटा लागवड तंत्रज्ञान

बटाटा पिकाची लागवड, पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, बीड, औरंगाबाद आणि नागपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. बटाट्यामध्ये प्रथिने, चुना, फॉस्फरस यासारखी खनिजे आणि ब व क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. बटाट्याचा उपयोग खाद्यपदार्थाशिवाय जनावरांच्या खाद्यात व अनेक उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणावर होतो.

हवामान कसे असावे : बटाटा हे थंड हवामानातील पीक आहे. या पिकास सरासरी १६ ते २१ सेल्सियस तापमान लागते. पिकाच्या सुरुवातीच्या काळात २४ अंश सें.ग्रे. तापमान पोषक असून बटाटे पोसण्याच्या काळात २० अंश सें.ग्रे. तापमान अनुकूल असते. बटाटे लागवडीच्या वेळी उष्ण व बटाटे पोसण्याच्या वेळी थंड हवामान या पिकास पोषक असते.

जमीन कशी निवडावी :मध्यम ते हलक्या व गाळाच्या जमिनीत बटाट्याची लागवड चांगल्या पद्धतीने करता येते. जमीन कसदार, भुसभुशीत व उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीचा सामू ६ ते ८ च्या दरम्यान असावा.

बियाण्याचे प्रमाण : बियाणे उत्तम दर्जाचे असावे. हेक्टरी २० चे २५ क्विंटल बियाणे लागवडीस पुरेसे असते. लागवडीपूर्वी बियाणे डायथेन एम- ४५ हे १०० ग्रॅम ४५ लिटर पाण्यात ५ मिनिटे बुडवावीत व नंतर लागवडीसाठी वापरावी.

पूर्वमशागत : जमीनीची २० ते २५ सें.मी. नांगरट करावी. १ महिनाभार जमिनीस ऊन द्यावे. पुन्हा एक आडवी नांगरट करावी. ढेकळे फोडण्यासाठी व जमीन समपातळीत आणण्यासाठी कुळवाच्या दोन तीन पाळ्या देऊन जमीन



भुसभुशीत करावी. जमिनीत हेक्टरी ५० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरावे.

लागवड कशी करावी : सरासरी बेण्याचे वजन जास्तीत जास्त ५० ते १०० ग्रॅम असावे. बेण्याचा आकार मध्यम असावा. बटाट्याचे आकारमानानुसार दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सें.मी. आणि दोन बेण्यातील अंतर १५ ते २० सें.मी. ठेवावे. ट्रॅक्टरच्या सहाय्याने सरी-वरंबा पद्धतीने लागवड केल्यास २० २० सें.मी. अंतरावर लागवड करावी.

खते व पाणी व्यवस्थापन : बटाटा पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाशची आवश्यकता असते. बटाट्याची मुळे जमिनीत वरच्या थरात वाढत असल्यामुळे या पिकास पाण्याच्या पाळीच्या वेळेस कमी पाणी द्यावे. लागवडीनंतर पहिले पाणी हलके द्यावे. जमिनीलगतच्या फांद्या वाढून त्यांची टोके फुगीर होऊ लागल्यावर व बटाटा पोसण्याच्या वेळेस ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पिकाची वाढ पूर्ण झाल्यावर पाण्याच्या पाळ्या कमी कराव्यात.

आंतरमशागत : बटाट्याच्या आंतरमशागतीत तण काढणे व खुरपणी या बरोबर भर देणे हे महत्त्वाचे काम आहे. तीन चार वेळा खुरपणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी. खतांचा दुसरा हप्ता देताना झाडांना मातीची भर द्यावी.

कोणते वाण निवडावेत : कुफरी लवकर, कुफरी चंद्रमुखी, कुफरी सिंदूरी. याशिवाय कुफरी बादशाह, कुफरी, कुबेर, कुफरी, ज्योती, कुफरी अलंकार, कुफरी चमत्कार या जाती लागवडीस योग्य आहेत.

रोग व कीड : करपा रोगावर उपाय : डायथेन एम- ४५ किंवा डायथेन झेड-७८ हेक्टरी २ किलो फवारावे किंवा बोर्डो मिश्रण १:१:१०० या प्रमाणात पसरावे.

मर रोगावर उपाय : पिकांची फेरपालट आणि नियमित पाण्याच्या पाळ्या देऊन रोग आटोक्यात आणता येतो. जमिनीत नॅप्थॅलिन किंवा फॉरमॅलिन (१:५०) मिसळून दिल्यास रोगाचे बीज मरते.

१) देठ कुरतडणारी अळी उपाय : या किडीच्या बंदोबस्तासाठी क्लोरेड एम ५ टक्के पावडर हेक्टरी ५० किलो जमिनीवर सायंकाळी धुरळावी. २) मावा व तुडतुडे उपाय : लागवडीनंतर १५ दिवसांनी एन्डोसल्फान ३५ ई.सी. ७०० मि.ली. किंवा फॉस्फोमिडॉन ८५ डब्ल्यू एमसी. १८८ मिली ५०० लिटर पाण्यात प्रति हेक्टरी मिसळून फवारावे. ३) बटाट्यावरील पतंग उपाय : या किडीच्या बंदोबस्तासाठी कार्बारील ५० डब्लू. पी. १.५ किलो ७५० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

काढणी आणि उत्पादन : सर्व सुधारीत तंत्राचा उपयोग करून बटाट्याचे पीक घेतल्यास लवकर तयार होणाऱ्या जातीचे उत्पादन हेक्टरी २०० किंटल तर उशिरा तयार होणाऱ्या जातीचे उत्पादन हेक्टरी २५० ते ३०० क्विंटल पर्यंत येऊ शकते.




### महत्वाच्या घटना

१६१० : गॅलेलिओ यांनी दुर्दार्शीच्या सहाय्याने इयो, युरोपा, गॅनिमिडी आणि कॅलिस्टो या गुरूच्या चार उपग्रहांचा शोध लावला.
१६८० : मुंबई कौन्सिलने शिवाजी महाराजांबरोबर करायच्या कराराचा मसुदा तयार केला.
१७१४ : पहिल्यांदा हेनरी मिल ने टाईप राईटर चा शोध लावला.
१७८९ : अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची पहिली निवडणूक होऊन त्यान जॉर्ज वॉशिंग्टन विजयी झाले.
१९२२ : पंजाब केसरी लाला लजपतराय आणि त्यांचे सहकारी पंडित संतानम यांना राजद्रोहाच्या आरोपावरुन १८ महिन्यांची शिक्षा झाली.
१९२७ : न्यूयॉर्क ते लंडन अशी अटलांटिक महासागर पार करणारी दूरध्वनीसेवा सुरू झाली.
१९३५ : कोलकाता येथे 'इंडियन नॅशनल सायन्स अ‍ॅकेडमी'चे उद्घाटन झाले. पुढे १९५१ मधे तिचे मुख्यालय दिल्लीला हलवण्यात आले.
१९५९ : क्यूबातील फिडेल कॅस्ट्रो यांच्या सरकारला अमेरिकेने मान्यता दिली.
१९६८ : अमेरिकेचे सर्व्हेयर यान चंद्राच्या टायको या विवराच्या किनारी उतरले.
१९७२ : कन्याकुमारी येथील विवेकानंद केन्द्राचे काम पूर्ण झाले.
१९७८ : एम. व्ही. चंद्रगुप्त ही मालवाहू नौका ६९ कर्मचार्यांसह होनोलुलूजवळील महासागरात बेपत्ता झाली.
१९८० : पुन्हा एकदा लोकसभेच्या निवडणूकांमध्ये काँग्रेस बहुमताने विजयी.
२००३ : जपान ने विकास कामांसाठी भारताला ९० कोटी डॉलर्सची मदत देण्याची घोषणा केली.
२०१४ : आजच्या दिवशी शेख हसीना ने बांगलादेश च्या निवडणुक जिंकली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९३ : जानकीदेवी बजाज – स्वातंत्र्य वीरांगना (मृत्यू: २१ मे १९७९)
१९२० : सरोजिनी बाबर – लेखिका, संतसाहित्याच्या अभ्यासिका व राजकारणी (मृत्यू: १९ एप्रिल २००८)
१९२१ : चंद्रकांत गोखले – अभिनेते (मृत्यू: २० जून २००८)
१९२५ : 'प्रभात' स्वातंत्र्यवीर सावरकर यांची कन्या.
१९२८ : विजय तेंडुलकर – नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)
१९४८ : शोभा डे – विदुषी व लेखिका
१९६१ : सुप्रिया पाठक – अभिनेत्री
१९६७ : जगप्रसिद्ध अभिनेता इरफान खान यांचा जन्म.
१९७९ : बिपाशा बासू – अभिनेत्री व मॉडेल.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९८९ : मिचेनोमिया हिरोहितो – दुसऱ्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (जन्म: २९ एप्रिल १९०१)
१९४३ : वाय फाय चा शोध लावणारे संशशोधक निकोला टेसला यांचे निधन.
२००० : डॉ. अच्युतराव आपटे – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची व त्याद्वारे सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी आयुष्य वेचलेले विद्यार्थी सहायक समितीचे संस्थापक व स्वातंत्र्यसैनिक.
२०१६ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांचे निधन.

# मुळ्याच्या लागवडीसाठी वापरा योग्य जाती

सध्या शेतकरी वेगेवेगळ्या पिकांची लागवड करून चांगले उत्पन्न घेत आहेत. कमी खर्चामध्ये शेतकरी जास्त नफा मिळवत आहेत. यासाठी शेतकरी नवनवीन पिकांची लागवड करण्यास प्राधान्य देतात. आपल्याकडे अनेकजण मुळा शेती देखील करतात आणि यामधून चांगला नफा कमावतात. बऱ्याचदा मुळा शेतीती परवड नसल्याचे देखील अनेक शेतकरी म्हणतात. मात्र यामध्ये न परवडण्याचं कारण म्हणजे तुम्ही मुळा लागवड करताना योग्य वाणाची लागवड करत नाहीत. त्यामुळे परवडत नाही, यासाठी योग्य जात निवडावी लागते.

योग्य वाणाची निवड महत्वाची :मात्र तुम्ही जर यामध्ये योग्य वाणाची लागवड केली तर तुम्हाला यामधून चांगला फायदा मिळतो. कोणत्याही पिकाची लागवड करायची म्हटले की योग्य वाणाची निवड करणे गरजेचे आहे. तसेच मुळा लागवड करताना देखील योग्य वाणाची लागवड करणे गरजेचे आहे. भारतीय कृषी संशोधनाने मुळ्याच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. त्यामध्ये पुसा चेतकी आणि पुसा मृदुला या जातींची लागवड करून तुम्ही चांगले उत्पादन घेऊ शकता. पुसा चेतकी व पुसा मृदुला या जातींची लागवड कमी वेळात लवकर होते. या जातीच्या मुळ्याची पाने एकसारखी हिरवी व न कापलेली



असतात व त्याची पाने भाजीमध्ये वापरतात. या जातीचे उत्पादन ३५ ते ४० पर्यंत मिळते. पुसा चेटकीची मुळं २५ ते ३० सेंमी लांब, खायला खूप चवदार असतात. परिमाणी याला बाजारात देखील मोठी मागणी असते आणि बाजारात मागणी असल्यामुळे याला भाव देखील चांगला मिळतो.

पुसा मृदुला :मुळ्याची पुसा मृदुला ही जात गोलाकार व लाल रंगाची असते. तसेच ही जात फार कमी वेळात तयार होते. त्याच्या तयार होण्याचा कालावधी २८ ते ३२ दिवसांचा असतो. मुळ्याचे मूळ हे कमी असते. मात्र यातून उत्पादन जास्त निघते. याच्या लागवडीसाठी चुनखडी किंवा चिकणमाती माती त्याच्या पेरणीसाठी चांगली मानली जाते. ती मेडवर देखील पेरली जाऊ शकते. याची लागवड करताना ज्या शेतात पाणी साचणार नाही त्या ठिकाणी लागवड करावी.

# मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत रखडलेले शेत पाणंद रस्ते पावसाळ्यापूर्वी पुर्ण करा

## जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन- डॉ.गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली मात्र शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव क्लेशदायक असुन बीड जिल्ह्यातील मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजनेंतर्गत शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४४८ कामे म्हणजेच २३ टक्केच कामे पूर्ण झाली असुन ग्रामीण भागात ही योजना मृगजळ झाली असुन ग्रामस्थांना स्वखर्चाने रस्ते करण्याची वेळ आली असुन जिल्हा प्रशासनाने तातडीने प्रलंबित शेत/ पाणंद रस्त्यांची कामे सुरू करून पावसाळ्यापूर्वी पुर्ण करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष





( इंटक), सखाराम बेंगडे, बीड जिल्हासचिव (इंटक),शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन, शिवशर्मा शेलार यांनी अविनाश पाठक जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत रोहयो मंत्री भरत गोगावले यांना केली आहे.

शेत/ पाणंद रस्त्यांची कामे पावसाळ्यात करणे अडचणीचे असते.सदर कामांना खरीप हंगामानंतर सुरूवात केल्यास कामे विना खंड पुर्ण होऊ शकतात ही बाब विचारात घेऊन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजेच उन्हाळ्याच्या कालावधीत पूर्ण करून घेणे आवश्यक आहे.

आर्थिक वर्षामध्ये प्रारंभी पासुनच शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना सुरुवात होणे आवश्यक असल्याचे मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत शासन परिपत्रकात म्हटले आहे. शेतवस्त्या आणि पाणंद रस्त्यांच्या कामांची बीड जिल्ह्यात मोठी समस्या निर्माण झाली आहे.मोबाईल मानिटरींग अँप मुळे मजुरांची हजेरी घेणे अवघड झाले आहे.सदरील हजेरीसाठी सार्वजनिक कामासाठी दिवसातून दोन वेळा मजुरांचे फोटो काढावे लागत असल्याने व कामावर मजूर दाखवणे अवघड झालेले आहे. त्यामुळे रस्त्यांची कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे किचकट प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याची आवश्यकता असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

## महापालिकेवर पहिले महापौर विष्णू पाचफुले -आ. खोतकर



जालना। प्रतिनिधी

तुम्हाला यावेळेस शिवसेनेचे नगरसेवक निवडून द्यावे लागतील आणि पहिले महापौर शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले होईल असं आवाहन शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी जालनेकरांना केलंय. दुसऱ्या विचाराची महानगरपालिका आली तर आपल्याला आपल्या विचाराचा ठराव घेता येणार नाही. आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊ नका असा सल्ला खोतकर यांनी जालन्यातील नागरिकांना दिलाय.

जालना शहरातील संजयनगर भागात आज दिनांक पाच जानेवारी आमदार अर्जुन खोतकर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांच्या विविध विकास कामाचं उद्घाटन करण्यात आला आहे . यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. त्यांना आता घबराट सुटली असून त्यांची उरलेली धरपड या महानगरपालिका निवडणुकीत बंद पडणार आहे असा निशाणा आमदार अर्जुन खोतकर यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर नाव न घेता साधलाय. ज्या समाजाने तुम्हाला दिलं, त्या समाजाला तुम्ही अस्तीनमधले साप म्हणतात ही गंभीर बाब आहे असं खोतकर यांनी कैलास गोरंट्याल यांच्या अस्तीनचा साप या वक्तव्यावर बोलतांना म्हटलंय. तुम्ही यंदा महानगर पालिका शिवसेनेच्या ताब्यात द्या, आम्ही तुम्हाला दिलेले शब्द खरे करून दाखवू असं आवाहन खोतकर यांनी नागरिकांना केलय. स्वतःचं पाप झाकण्यासाठी तुम्ही लोकांना अस्तीन मधले साप म्हणतात अशी जोरदार टीका आमदार खोतकर यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर केलीय.यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेश दादा सुपारकर किरण शिरसाट गौरव नवगिरे प्रकाश मामा घोडे अवघड आप्पा ज्ञानेश्वर सुतारकर माजी नगरसेवक काशिनाथ मगरे यासह शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## || थोडक्यात



### प्रा. अजिंक्य साखरे रचित महाकाव्याच्या ग्रंथाचे प्रकाशन

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात कार्यरत प्रा. अजिंक्य साखरे यांच्या इंग्रजी महाकाव्याच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन नुकतेच उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर होत्या. त्यांच्या हस्ते अजिंक्य साखरे यांच्या 'द टेल ऑफ हॅरिस अँड मॅरिनोस - ॲन एपिक' या इंग्रजी महाकाव्याच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन करण्यात आले व अजिंक्य साखरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. व्ही. टी. देशमाने, चौसाळयाच्या कला व विज्ञान महाविद्यालयाच्या कार्यालय अधिक्षक श्रीमती एस. सी. खडके, मुख्याध्यापक वीणा भोज उपस्थित होते.याप्रसंगी डॉ. दीपा क्षीरसागर यांनी प्रा. अजिंक्य साखरे यांना पुढील साहित्यिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात दर्पण दिन साजरा

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ६ जानेवारी रोजी



दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत उपस्थित होते.दर्पण दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्रसिद्धी विभाग प्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश यांचा उत्कृष्ट प्रसिद्धी कार्याबद्दल ग्रंथालय विभागामार्फत प्राचार्य आबासाहेब हांगे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जगन्नाथ पटाईत यांनी केले. सूत्रसंचालन अंगद दराडे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रोफेसर हमराज उईके यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### केएसके कृषि महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती

बीड । प्रतिनिधी

केएसके (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयामध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने मुलींसाठी स्वयंसंरक्षण व सोशल मिडीयाचा प्रभावी योग्य वापर या विषयावर सौ. शांता खेडकर, जिल्हा महिला व बालविकास समुपदेशक, बीड यांनी मार्गदर्शन केले.सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंके, दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बालनंदनवनात मराठी पत्रकार परिषदेचा दर्पणदिन उत्साहात

शिरूर। प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद शिरूर कासार यांच्या वतीने तालुक्यातील शिंगारवाडीफाटा येथील बालनंदनवन इंग्लिश स्कुल येथे सोमवार दि. ६ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य स्वरूपात दर्पण दिन सोहळा पार पडला आहे. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करत त्यांच्या कार्याला उजाळा दिला आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मराठवाडा विभागीय समन्वय सुभाष चौरे व जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस व तालुका अध्यक्ष जालिंदर नन्नवरे यांच्या आयोजनातून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. मराठी पत्रकार परिषदेचा मुख्य सोहळा म्हणजे दर्पण दिन हा होय. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षीही चंद्रकांत राजहंस व जालिंदर नन्नवरे यांच्या सह तालुका संघातील सर्व पदाधिकारी यांच्या आयोजनातून सोमवार दि. ६ जानेवारी रोजी तालुक्यातील बालनंदनवन इंग्लिश स्कूल शिंगारवाडीफाटा येथे आयोजित करण्यात आला




होता. बालनंदनवन इंग्लिश स्कूल संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रफुल्ल बारगजे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साही आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडला आहे. यावेळी कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व संस्थेच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवर पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आपोपली मनोगत व्यक्त करून दर्पण दिनाचे महत्त्व पटवून दिले. त्याच बरोबर ज्येष्ठ पत्रकार अशोक भांडेकर यांना दर्पण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र शिरूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली घुगे, तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष भागवत सानप, घुगे सर, संस्कृती बारगजे,ज्येष्ठ पत्रकार बबनराव देशमुख, विजयकुमार गाडेकर, अशोक भांडेकर, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, तालुकाध्यक्ष जालिंदर नन्नवरे, शंकर भालेकर, डिजिटल मीडियाचे अध्यक्ष ज्ञानदेव शिंगटे, गोरख तात्या खेडकर, दिगंबर गायकवाड, बाळकृष्ण मंगरूळकर, बबनराव रणदिवे, जीवन कदम आदींची उपस्थिती होती. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाल नंदनवन इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रफुल्लचंद्र बारगजे, सचिव सौ. मनीषाताई बारगजे, संचालक सचिन सानप, आकाश सानप मुख्याध्यापक गणेश रोकडे सहशिक्षक गोविंद बारगजे, अमोल होरणे, किशोर पांगरे, श्रीमती गोल्हार, श्रीमती किरण सानप, श्रीमती निकिता घाडगे, मानसी मुळे, गोवर्धन मिरड, ज्ञानेश्वर मिरड, अंगद मिरड, सौ. पार्वती बुधनर, सौ. आशाबाई माने, सौ. सुनिता सानप आदींनी मोठे मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक घुगे सर सूत्रसंचालन गोविंद बारगजे व आभार श्रीमती भाग्यश्री गोल्हार यांनी केले होते.

## जिल्हा उपाध्यक्षपदी अमोल राऊत

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्य१तील तळणी येथील पत्रकार अमोल राऊत यांची डिजिटल मिडिया संपादक पत्रकार महाराष्ट्र संघटनेच्या जालना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा



माने यांनी छत्रपती संभाजीनगर येथे ४ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन सन्मानित केले. यावेळी राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत , पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले व राज्यसभा इकबाल शेख यांची उपस्थिती होती. ग्रामीण भागातील डिजीटल मीडिया क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांना मदत होण्याबरोबरच या माध्यमाला सामाजिक मूल्य तसेच सामाजिक जबाबदारीच्या चौकटीत कार्यरत राहुन संघटनेची ध्येय, धोरणे तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. अमोल राऊत हे मागील अनेक वर्षापासून पत्रकारिताक्षेत्रात कार्यरत असून एक अभ्यासू पत्रकार म्हणून त्यांची जिल्ह्यात वेगळी ओळख आहे. त्यांची ही निवड ३१ डिसेंबर २५ पर्यंत असणार आहे. या निवडीबद्दल अमोल राऊत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## भाजपा सदस्य नोंदणी करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करणार-दानवे

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात भाजप पक्षाच्या सदस्यता नोंदणी महाअभियानाला आजपासून सुरुवात झाली आहे. यानिमित्त जालना विधानसभेत प्रत्येक बूथ वर सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. जालना विधानसभा सदस्य नोंदणी प्रमुख भास्कर आबा दानवे यांनी आज (०५ रोजी) रविवारी जालना महानगरातील प्रत्येक मंडळावर, बूथ वर जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधत अभियानाचा आढावा घेतला.

यावेळी जालना विधानसभा सदस्य नोंदणी प्रमुख भास्कर आबा दानवे यांनी जालना शहरातील बालाजी चौक, भोकरदन नाका येथून सदस्य नोंदणीची सुरुवात केली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, जालना विधानसभेत प्रत्येक बूथवर किमान २०० सदस्य नोंदणी होणे अपेक्षित आहे. जालना विधानसभेतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर सदस्य नोंदणी करायला सुरुवात



केली असून, जास्तीत-जास्त नोंदणी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदस्य नोंदणी मोहीम १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान चालणार आहे, मात्र या सदस्य नोंदणी मोहिमेत ५ जानेवारी हा दिवस महत्वाचा ठरणार आहे कारण पक्षाने या दिवशी विशेष सदस्य नोंदणी अभियान पुकारले आहे. सदस्य नोंदणीमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. किमान ५० सदस्य केल्याशिवाय कोणासही सक्रिय सदस्य म्हणून मान्यता मिळणार नाही. राष्ट्राला समर्पित भावनेने काम करणाऱ्या भाजपा च्या या महासदस्य नोंदणी अभियानात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे व या अनुषंगाने अभियानाला अधिक गतिमान करून सक्रीय सहभागासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे भास्कर आबा दानवे यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, सिद्धिविनायक मुळे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.

## तांदळेश्वर शाळेची शैक्षणिक सहल

बीड । प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेची यावर्षीची सहल कोकण तसेच महाबळेश्वर प्रति बालाजी या परिसरामध्ये गेली चार दिवस मुक्काम व सहल एकूण सहा दिवसाची होती.सहल दिनांक ३१ डिसेंबरला सुरुवात होऊन ४ जानेवारी २०२५ ला संपन्न झाली शाळेचे मुख्याध्यापक श्याम डाके सर यांच्या नेतृत्वाने व मार्गदर्शनाने सहलीचे आयोजन करण्यात आले.या सहलीचे सहल प्रमुख सहशिक्षक शिवाजी पवार सर यांनी जबाबदारी पाहिली. या सहलीसाठी अथक परिश्रम घेणारे विद्यार्थी प्रिय शिक्षक श्रीहरी लहाने सर कल्याणजी वामने सर गणेश जी काशीद सर सेवक काटवटे नाना व राजेभाऊ काळे इत्यादींची खूप खूप सहकार्य लाभले.सहल सुरुवातीला पंढरपूर विठ्ठलाचे दर्शन घेऊन दत्ताच्या दर्शनासाठी नृसिंहवाडी येथे गेली असता त्या ठिकाणी सकाळचा नाश्ता स्नान होऊन कोल्हापूर परिसर पाहण्याचा विद्यार्थ्यांनी आनंद घेतला या मध्ये कनेरी मठ देवीचे दर्शन न्यू पॅलेस रंकाळा धरण पन्हाळगड ज्योतिबा दर्शन व ज्योतिबा मध्ये मुक्काम केला त्यानंतर दुसऱ्या दिवशी श्री नरेंद्र स्वामी यांचे नानिज्धाम मठ पाहून गणपतीपुळे येथे सागराच्या पाण्याचा आनंद घेतला व नवसाला पावणाऱ्या गणपतीचे दर्शन घेऊन गणपतीपुळे या ठिकाणी मुक्काम केला दुसऱ्या दिवशी सहल रत्नदुर्ग किल्ला रत्नागिरी येथे पाहून येथील अरबी समुद्रात चा आनंद घेतला.

## मंठा तालुक्यातील जनतेने मला भरभरुन प्रेम दिले - धोंडीराम राठोड

मंठा। प्रतिनिधी

शिक्षणमहर्षी, लोकनेते माजी आमदार धोंडीराम राठोड यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांच्यासह जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. अभिष्टचिंतन, नागरी सत्कार व गौरवग्रंथ प्रकाशन समितीच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पोहरादेवी गडाचे महंत आमदार बाबूसिंग राठोड, आमदार राजेश राठोड, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेभाऊ देशमुख, उपसभापती गोपाळराव बोराडे, काँग्रेस नेते राजेंद्र राख, अंकुशराव अवचार, व्यापारी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष भारतसेठ बोराडे, नगराध्यक्ष बालासाहेब बोराडे, माजी नगराध्यक्ष नितीन राठोड, उपनगराध्यक्ष जे के कुरेशी, नगरसेवक प्रदीप बोराडे, अरुण वाघमारे, उबेद बागवान, विकास सूर्यवंशी, राजेश खंदारे, अचित बोराडे, बाजखान पठाण शरद बोराडे, बाजार समितीचे संचालक सचिन राठोड यांच्यासह



मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी माजी आमदार धोंडीराम राठोड व सौ लताताई राठोड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक म्हणाले की, धोंडीरामजी राठोड यांनी अतिशय कष्टामधून हे शैक्षणिक साम्राज्य उभा केले आहे. तसेच त्यांनी या परिसरामध्ये विकासाची गंगा आणली. त्यामुळे गोरगरिबांच्या मुलांना शैक्षणिक प्रगती करता आली असे गौरवोद्गार काढले. पोहरागडाचे महंत आमदार बाबू सिंग राठोड यांनी आशीर्वादपर मार्गदर्शन करताना सांगितले की, धोंडीरामजी राठोड आणि आमदार राजेश राठोड यांना आई जगदंबेचा आशीर्वाद आहे. भविष्यात त्यांची अशीच उत्तरोत्तर प्रगती होईल असे सांगितले. यावेळी माजी आमदार धोंडीराम राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्व. वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक माझ्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले म्हणूनच या ठिकाणी उभा आहे. त्यांनी मला वेळोवेळी साथ दिली. तसेच तालुक्यातील जनतेने मला भरभरून प्रेम दिले त्यांचे ऋण फेडणे कदापिही शक्य नाही अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रास्ताविक करताना आमदार राजेश राठोड म्हणाले की, भाऊंनी गाव तांड्यातील व ग्रामीण भागातील लोकांना आवश्यक असलेला शिक्षणाचा प्रश्न आपल्या संस्थेच्या माध्यमातून सोडविला. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक धार्मिक कार्याच्या माध्यमातून आदर्श निर्माण केला त्यांचे आशीर्वाद माझ्यासोबत आहेत म्हणून मी समाजाचे प्रश्न सोडवीत असल्याचे त्यांनी सांगितले. अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भव्य रक्तदान शिबिर, मोफत भव्य महाआरोग्य शिबिर, प्रसिद्ध कवी फ मु शिंदे यांच्यासह कवींची काव्यमैफील, प्रसिद्ध गायक नितीन सरकटे यांचा म्युझिकल ऑर्केस्ट्रा अशा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रदीप देशमुख व प्रा. रंगनाथ खेडेकर यांनी केले. यावेळी राठोड परिवारातील सर्व सदस्य, मंठा शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

राज्य
# लोकतंत्र
मंगळवार, दि.७ जानेवारी २०२५ | ६

# माजलगाव तालुक्यात घरकुल योजनेचा बट्ट्याबोळ

## गटविकास अधिकारी,घरकुल अभियंता,संगणक परिचालकाची चौकशी करून बडतर्फ करण्याची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

घरकुल योजना ही शासनाची महत्वकांक्षी योजना असून या योजनेत अधिकारी व कर्मचारी खोडा घालत लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित ठेवत आहेत. त्यामुळे पंचायत समिती माजलगाव येथील संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून बडतर्फ करणे याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

याबाबत निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, माजलगाव पंचायत समिती घरकुल विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यावर गटविकास अधिकारी घरकुल सारख्या महत्त्वकांशी योजनेत खोडा घालून बदनाम करण्याचे काम अनेक दिवसापासून बिनबोभाट सुरू आहे.लाभार्थ्यांना घरकुल रेखांकन दिल्यानंतर ६/६ महिने घरकुल अभियंता लाभार्थ्याकडे फिरकत नाही. लाभार्थ्यांना जरी भेटी दिल्या तरी त्यांच्याकडून चिरीमिरी घेतल्याशिवाय हप्ते टाकले जात नाहीत.माजलगाव तालुक्यात आज ही हजारो लाभार्थी हक्काच्या घरकुलापासून वंचित राहत आहेत. पात्रुड सर्कल मधील प्रत्येक गावातील लाभार्थी वर्गात प्रचंड असंतोषाची



भावना निर्माण झाली आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुल अभियंत्यांना लक्ष्मी दर्शन न दिल्यास सध्या बजेट नाही म्हणून वेळ निभावून नेतात. सर्वसाधारणपणे दीड लाखाच्या रकमेत प्रत्यक्षात घरकुल अभियंता, विस्तार अधिकारी, ऑपरेटर यांना पैसे वाटप करून प्रत्यक्षात एक लाख रुपये शिल्लक राहतात.त्यातून घर कसे बांधायचे असा प्रश्न निर्माण झाल्याने घर बांधणीची लाभार्थ्यांची इच्छा राहत नाही लाभ देत असताना अभियंत्याकडून पात्र,गरजू लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचे स्पष्ट होते.ऑपरेटर मगरेची झुंडशाही/हुकूमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला टांगणाऱ्या घरकुल ऑपरेटर मगरेची प्रचंड हुकूमशाही वाढली असून लाभार्थ्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणाचेच हप्ते काढले जात नाहीत. गेल्या तब्बल १५ वर्षाहून अधिक काळापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने त्यांची हिंमत बिनदिक्कतपणे वाढली आहे. गटविकास अधिकारी माजलगाव या मगरेच्या काळ्या कारनाम्याला पाठीशी घालत असल्याने त्याची हिंमत वाढत चालली आहे त्यामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. माझे कोणीच वाकडे करू शकत नाही कोणी कमी जास्त केले तर खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतो. तरी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधिताची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे नसता आम्ही सर्वजण दि.२३ जानेवारी रोजी जिल्हा कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषणास बसू असे निवेदन नईम आतार, सोमेश्वर सोनटक्के, पृथ्वीराज निर्मळ, बालाप्रसाद जाजू यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड यांना दिले आहे.

# छत्रपती साखर कारखाण्याचा ऊस बिलाचा हप्ता २७०० ने बँकेत वर्ग - व्हा.चेअरमन मोहनराव जगताप

**माजलगाव । प्रतीनिधी**

**सावरगाव येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याने चालू गाळपातील उसाचा पहिला हफ्ता दोन हजार सातशे रुपयांनी बँकेत वर्ग केला आहे.**



छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जिल्हा बीड या कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मधील दि. २७/११/२०२४ ते दि. १५/१२/२०२४ पर्यंत एकूण ४४९४१.८६८ मे. टन उसाचे गाळप केले असून त्याचे बिल २७००/- रुपये प्रति टना प्रमाणे एकूण रक्कम १२१३४३०८७/- रुपये बँकेत वर्ग केले आहेत.

तसेच कारखान्याचे कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करण्यासाठी कारखाना प्रशासनाने योग्य पद्धतीने नियोजन करून उसाचे गाळप करीत आहे व योग्य वेळी सर्व शेतकऱ्यांचे बिल बँकेत जमा केली आहेत.


कारखान्याचे चेअरमन मा.श्री.बाजीराव सोनाजीराव जगताप व सर्व संचालक मंडळ यांनी कारखान्याचे गाळप क्षमता कमी असताना सुद्धा शेतकऱ्यांचे हित जपत व कारखान्याकडे कुठलेही उपपदार्थ नसताना सुद्धा योग्य भाव देऊन नियोजन करून गाळप करण्यास कठिबद्ध आहे. तरी भागातील शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपापली बीले आपल्या भागातील संबंधित बँकेस संपर्क साधून बीले जमा करून घ्यावेत अशी विनंती कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी केली आहे.

# पुरुषोत्तमपुरी येथे घराला भीषण आग

## आगीमध्ये ४० ते ५० क्विंटल कापसासह घरातील इतर वस्तू जळून खाक

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील बापु मुंडे यांच्या घराला दि ०५ डिसेंबर रविवार रोजी दुपारी भीषण आग लागली.या आगी मध्ये ४० ते ५० क्विंटल कापूस जळून खाक झालेला आहे,तसेच घरातील इतर मौल्यवान वस्तू व संसार उपयोगी साहित्य,धान्य जळून खाक झाले आहे.घराच्याजवळच असलेल्या शेतात हे कुटुंब काम करत होते घरी कोणी नव्हतं.जेव्हा आगीचे डोंब उसळला तेव्हा कळाले की आग लागली आहे.ही आग बघून



कुटुंब सैरावैरा धावत होते आग विझवण्याचा प्रयत्न करत होते पण तोपर्यंत सगळं काही जळून खाक झालेलं होतं.यामुळे मुंडे यांचे आतोनात नुकसान झालेले आहे आणि मुंडे कुटुंबाला जोरदार धक्का बसला आहे. घरातील सर्व काही या आगीमध्ये जळून खाक झालेलं आहे.या कुटुंबाने आपल्या शेतात पैसे खर्च करून कापसाची लागवड केली, राबराब राबून कापसाच्या पिकांचं उत्पादन घेतले होते आणि घरामध्ये ४० ते ५० क्विंटल कापूस होता कापसाला चांगला भाव मिळेल या आशेने कापूस घरात ठेवला होता पण तो ही जळून खाक झालेला आहे.आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्रशासनाने झालेल्या घटनेची पाहणी करून पंचनामा पण केलेला आहे.सदरील घटनेतील कुटुंबाला आर्थिक सहाय्य करावे अशी मागणी या कुटुंबांनी केलेली आहे.

# योगेश्वरी कन्याशाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची उत्साहात सांगता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्याशाळेच्या सुवर्ण महोत्सवाची सांगता सुप्रसिद्ध अभिनेत्री व मराठी शाळेच्या सदिच्छा दूत चिन्मयी सुमीत यांची रॅली काढून उत्साहात करण्यात आली . शाळेच्या माजी विद्यार्थीनींनी व शिक्षिकांनी साकारलेल्या स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले.**





सुरुवातीला सकाळी मान्यवरांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांच्या अर्धपुतळ्यात पुष्पहार अर्पण केला .शोभा यात्रेची सुरुवात प्रमुख अतिथींच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आली . फेटे बांधलेले शानदार ढोल पथक , खेळाडूंची पेटती मशाल,विविध वेशभूषा साकारलेल्या विद्यार्थिनी , बरची पथक ,लेझीम पथक व फूलांनी सजवलेल्या जीपमधून प्रमुख अतिथींची मिरवणूकीने सर्वांचे लक्ष वेधले होते .

शाळेच्या परिसरात शोभायात्रेचे आगमन होताच पाहुण्यांन वर पूष्पवृष्टी करून स्काऊट गाईड पथकाने त्यांचे जोरदार घोषणा देत स्वागत केले .सावित्रीबाई फुले यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात ◀◀ पान ३ वर

# जिल्हा माहिती कार्यालयात मराठी पत्रकार दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित दर्पण दिन अर्थात मराठी पत्रकार दिनाचा कार्यक्रम आज कार्यालयात पत्रकारांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात दर्पण दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने कार्यालयाला बाळशास्त्री जांभेकर यांची एक प्रतिमा भेट देण्यात आली. मराठी पत्रकार परिषदेचे राजेंद्र होळकर



तसेच विलास डोळसे यांनीही प्रतिमा जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांना प्रदान केली.

येणाऱ्या काळात पत्रकारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून विविध प्रकारच्या योजनांचे अर्ज आणि इतर बाबींवर यावेळी जिल्हा माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. ◀◀ पान ३ वर

# गोविंदभाई श्रॉफ युवा पिढीचे अखंड ऊर्जास्रोत-शिरीष देशमुख

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन तत्वनिष्ठ जीवनातून विद्वत्ता,नम्रता,सभ्यता आणि नैतिकतेचा मापदंड निर्माण करणारे पद्मविभूषण स्वातंत्र्यसेनानी गोविंदभाई श्रॉफ हे नव्या पिढीसाठीचे अखंड ऊर्जास्रोत आहेत असे प्रतिपादन नवविकास मंडळाचे संचालक तथा संपादक शिरीष देशमुख यांनी केले. मराठवाडा जनता विकास परिषद बीड जिल्हा शाखेच्या वतीने जवाहर विद्यालयात आयोजित युवक विकास परिषदेत प्रमुख मार्गदर्शन म्हणून श्री.देशमुख बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख होते.प्रमुख उपस्थितीत मजविपचे उपाध्यक्ष प्राचार्य सोमनाथ रोडे तर व्यासपीठावर मजविपचे सहसचिव सुमंत गायकवाड,प्रा.अर्जुन जाधव,सोमेश्वर वाघमारे यांची उपस्थिती होती.



# पु.ना.गाडगीळच्या चित्रकला स्पर्धा उत्साहात

बीड । प्रतिनिधी

पु.ना.गाडगीळ आणि सन्स व झपूर्झा कला आणि संस्कृती संग्रहालयाच्या माध्यमातून मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात. यंदाही रविवार दि.५ रोजी शहरातील सर्वेश्वर गणेश मंदिर, सहयोग नगर येथे या स्पर्धा घेण्यात आल्या. याला विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

पु.ना.गाडगळी आणि सन्स व झपूर्झा कला आणि संस्कृती संग्रहालय पुणे चे सर्वेसर्वा अजित (काका) गाडगीळ व रिजनल हेड जितेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंतरीक्ष या विषयावर मुलांनी सुंदर चित्रे रेखाटली. यामध्ये साधारण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उत्कृष्ठ चित्रासाठी दोन्ही गटांमध्ये चांदीची तीन - तीन मेडल देण्यात



आले. यावेळी संस्थेचे व्यवस्थापक आनंद दंतकाळे, सुपरवाइझर नितीन खोसे, शार्दुल खडके, सर्वेश्वर ट्रस्टचे राजेंद्र सर, कुलकर्णी सर, बलदवा सर आणि पु.ना.गाडगीळ आणि सन्स बीड शाखेचा सर्व स्टाफ उपस्थित होता. ५ वी ते ७ वी गट प्रथम - तेजस्विनी कदम, द्वितीय - जिविका बारगजे, तृतीय - ऐश्वर्या नेटके. ८ वी ते १० वी गट प्रथम - समीक्षा पटाईत, द्वितीय - श्रावणी गोरे, तृतीय - आरोही शेजुल या विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली. सर्व यशस्वीतांचे अभिनंदन यावेळी करण्यात आले. याशिवाया स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला पु.ना.गाडगीळच्या वतीने आकर्षक गिफ्ट देण्यात आले.

# पत्रकार संजय सानप यांना दर्पण पुरस्कार जाहीर!

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड शाखेच्या वतीने पत्रकारांसाठी दर्पण दिनाच्या निमित्ताने देण्यात येणारा यंदाचा दर्पण पुरस्कार पाटोदा येथील पत्रकार संजय सानप यांना नुकताच जाहीर झाला आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या शाखेच्या वतीने दरवर्षी पत्रकार दिनाचे निमित्त साधून जिल्ह्यातील अकरा पत्रकार आणि एक वृत्तपत्र विक्रेता यांना पुरस्कार देऊन गौरवण्याची परंपरा आहे. यंदाचे हे पुरस्कार आज पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि संस्थापक अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

या पुरस्कारार्थी मध्ये पाटोदा येथील दैनिक लोकाशाचे तालुका प्रतिनिधी संजय सानप यांना यंदाचा दर्पण पुरस्कार जाहीर झाला आहे. यासंबंधीचे पत्र त्यांना प्राप्त झाले असून येत्या काही दिवसांमध्ये बीड येथील विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल, अशी माहिती बीड जिल्हा ◀◀ पान ३ वर

# तलाठी, मंडळ अधिकारी सज्जावर पाठवा अन्यथा कार्यालये अवैद्य धंद्यावाल्यांना भाड्याने द्या –ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात तलाठी, मंडळ अधिकारी हे गेल्या दहा वर्षापासून सज्जावर जात नाहीत व वास्तव्यास देखील राहत नाहीत, परंतु शासनाची घर भाडे घेऊन फसवणूक करतात याबाबत शेतकरी कामगार पक्षाने तहसील कार्यालय, उपविभागीय, अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय या विविध कार्यालयांना अनेक वेळा निवेदने देऊन व अनेक आंदोलने करून तलाठी, मंडळ अधिकारी यांना सज्जला वास्तव्यास पाठवून सज्जालाच कार्यालये थाटण्याचा



आदेश देण्यास भाग पाडले, परंतु शासनाचा आदेश येऊनही तलाठी, मंडळ अधिकारी हे शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत माजलगाव शहरात खाजगी कार्यालये थाटून खाजगी व्यक्ती मार्फत प्रचंड माया जमवत आहेत, तालुक्यातील तलाठी, मंडळ अधिकारी हे जर सज्जाला जाणार नसतील तर जनतेच्या पैशातून कोठ्यावधी रुपयांचे बांधकाम केलेले तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालये गुरांचे गोठे व उकंडे बनण्या पेक्षा अवैध धंद्यावाल्यांना तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालये उपयोगी पडू शकतात करिता अवैद्य धंद्यावाल्यांना तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालय भाड्याने देऊन त्यातून महसूल जमा करावा आणि शासनाचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करावा अशा उपहासात्मक अशायाचे निवेदन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाई मुंजा पांचाळ श्रीराम शेवाळे आदींनी दिले आहे.

# आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद - रूपालीताई चाकणकर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद आहे गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत या संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे इतर पत्रकार संघानी दखल घेऊन समाजासाठी काम करावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर यांनी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे पुणे येथील



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्या हस्ते आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

त्यांच्या संपर्क कार्यालयात सोमवारी दुपारी प्रकाशन प्रसंगी केले.आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गेल्या १२ वर्षांपासून दिनदर्शिका प्रकाशित करून सर्वसामान्यांना मोफत वितरण करण्यात येत असते सन २०२५ च्या दिनदर्शिकेचे पुणे येथील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर यांच्या पुणे येथील संपर्क कार्यालयात दि.६ जानेवारी रोजी त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले पत्रकार संघाच्या कार्याचे सौ.रुपालीताई चाकणकर यांनी कौतुक केले यावेळी अध्यक्ष अविनाश कदम, संतोष शेठ सानप,पत्रकार अतुल जवणे,प्रेम पवळ,अक्षय विधाते, सचिन तावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिका पत्रकार कक्षात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

## पत्रकार दिनाचे औचित्य साधून युवा वेध या साप्ताहिकाचे प्रकाशन





पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठीतील पाहिले वृत्तपत्र ' दर्पण ' सुरू केले होते. सहा जानेवारी हा दिवस पत्रकार साजरा केला जातो तसेच बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती देखील याची दिवशी साजरी केली जाते. पिंपरी चिंचवड महानरपालिकेच्या पत्रकार कक्षात आज बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष गणेश मोकाशी व पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापालिका जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि पिंपरी चिंचवड शहरातील अनेक पत्रकार उपस्थित होते.

यावेळी पत्रकार दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक युवा वेध चे प्रकाशन देखील करण्यात आले. तसेच मराठी पत्रकार परिषदेच्या उपाध्यक्षपदी गणेश मोकाशी यांची नियुक्ती झाल्याबद्दल पिंपरी चिंचवड पत्रकर संघाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महापालिका जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांचा देखील यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. याच बरोबर नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमात पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे विशेष कौतुक करण्यात आले त्यामुळे अध्यक्ष अनिल वडघुले यांना देखील पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले. पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक केले. यावेळी पत्रकार विनय सोनवणे, माऊली भोसले, रामकुमार शेडगे, सागर सूर्यवंशी, पराग डिंगणकर, अशोक कोकणे, संतोष गोतावळे इत्यादी पत्रकार मंडळी उपस्थित होते.

# पुण्यात भाजप युवा मोर्चा सचिवाच्या बॅगमध्ये पिस्तूल आणि २८ काडतुसे, प्रवासादरम्यान एअरपोर्टवर अटक!

पुणे । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सरपंच हत्याप्रकरणावरुन सध्या राजकारण चांगलंच तापलं असून पोलिसांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्धही कारवाईला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी व्हिडिओ व्हायरल झालेल्या बीडमधील कैलास फड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन पोलिसांनी आता त्यांचा शस्त्रपरवाना रद्द केलाआहे. एकीकडे बीडमध्ये (इशशव) ही मोहीम जोरदारपणे चालवली जात असताना, दुसरीकडे भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्याकडे पिस्तुलसह २८ काडतुसे आढळून आली आहेत. पुण्याहून (झींपश) हैदराबादला जात असतानाच्या प्रवासात हे शस्त्र आढळून आले असून पोलिसांनी ते जप्त केलं आहे. याप्रकरणी, पुढील तपास सुरू आहे. विशेष म्हणजे या व्यक्तीचे भाजपच्या (इगझ) बड्या नेत्यांसोबत फोटोही सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत.

पुण्याहुन हैद्राबादला निघालेल्या दिपक काटे नावाच्या प्रवाशाच्या बॅगमध्ये पिस्तुल आणि २८ जीवंत काडतुसे आढळून आल्यानंतर पुणे एअरपोर्टवरील सुरक्षा यंत्रणेकडून दिपक काटेला अटक करण्यात आली आहे. दिपक काटेला पुणे विमानतळ पोलीस स्टेशनमधील पोलीसांच्या हवाली करण्यात आलंय. दिपक काटे हा मुळचा पुणे जिल्ह्यातील इंदापूरचा रहिवाशी असून तो भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता आहे. शिवधर्म फाऊंडेशन या संघटनेचा संस्थापकही आहे. सोशल मिडीयावर त्यांचे अनेक भाजप नेत्यांसोबत सार्वजनिक कार्यक्रमांमधील फोटो दिसून येत असल्याने



त्याच्याबद्दल वेगवेगळ्या चर्चा सुरु झाल्या आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, हर्षवर्धन पाटील, राम सातपुते, मुरलीधर मोहोळ या नेत्यांसोबत त्यांचे फोटो पाहायला मिळत आहेत. एअर पोर्टच्या आतमध्ये प्रवेश करताना मेटल डीटेक्टरच्या सहाय्याने त्याच्याकडील बॅगचे चेकींग झाले, असता त्यामधे पीस्तुल आणि काडतुसे असल्याचे सुरक्षा रक्षकांना लक्षात आले. त्यानंतर त्याच्याकडील काटेरी बॅग उघडून पाहिली असता आतमध्ये ७.६५ कॅलीबरचे पिस्तुल, दोन मॅगझीन आणि २८ जिवंत काडतुसे आढळून आली आहेत. या घटनेनंतर विमानतळ पोलिसांनी तात्काळ त्याच्याकडील पिस्तुल व त्यालाही ताब्यात घेतलं असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

# विकसित भारतासाठी पत्रकारांची भूमिका महत्त्वपूर्ण – राज्यपाल

पुणे । प्रतिनिधी

'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे माध्यम असले तरी पत्रकार नि:पक्षपाती असला पाहिजे. पत्रकारांकडून सत्य आणि नि:पक्षपाती वृत्तांकनामुळे भारतीय लोकशाही अधिक सुदृढ होईल. नागरिकांपर्यंत सत्य पोचत नाही तोपर्यंत विकसित भारताचे लक्ष्य पूर्ण होऊ शकणार नाही. त्यासाठी प्रतिभावान पत्रकार महत्त्वाची भूमिका बजावत आहेत,' असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

मराठी पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त पुण्यात आयोजित 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉन' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, 'पुढारी'चे योगेश जाधव, 'लोकमत'चे समूह संपादक विजय बाविस्कर, 'पुण्यनगरी'चे भावेश शिंगोटे, मंदार फणसे, आदित्य जावडेकर, किरण जोशी, कल्पना जावडेकर आदी उपस्थित होते.राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, 'सर्व क्षेत्रात 'एआय'मुळे शास्त्रीय विकास होणार आहे. पत्रकार संघटनेने पत्रकार दिनासाठी 'एआय' ही नावीन्यपूर्ण संकल्पना निवडली आहे. आज 'एआय' माध्यमांसह उद्योगांमध्ये परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आली असताना ही निवड महत्त्वाची आहे.'

### 'एआय' म्हणजे दुधारी तलवार – चंद्रकांत पाटील

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, 'एआय तंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्रात क्रांती होताना दिसत आहे. पत्रकारिता क्षेत्रही त्याला अपवाद नाही. येत्या काळात 'एआय'चा फायदा मोठ्या प्रमाणात होईल. पण 'एआय' ही एक दुधारी तलवार असून, चांगल्या कामांसाठी त्याचा प्रभावी वापर व्हायला हवा.'

या वेळी राज्यपाल राधाकृष्णन यांना सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. 'सकाळ' माध्यम समूहाच्या कार्यकारी संपादक शीतल पवार यांच्यासह 'पुढारी'च्या स्मिता जाधव, 'लोकमत'चे यदू जोशी, 'न्यूज १८ लोकमत'चे विलास बढे यांना 'संपादक व्रतस्थ पुरस्कार' प्रदान करण्यात आला. विशेष पुरस्कार रुपेरी किनार फाउंडेशनच्या संस्थापक कल्पना जावडेकर, 'एड्यूटेक'चे नीलेश खेडेकर यांना देण्यात आले. तसेच, हॅकेथॉनमध्ये उत्कृष्ट काम केलेल्या महाविद्यालयांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# शहर सोडा, नाही तर ७ पिढ्यांची आठवण देऊ' ; पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा गुन्हेगारांना सज्जड दम

पुणे । प्रतिनिधी

बेकायदेशीर धंदे केले, गँग चालवून खंडणी मागितली आणि बळाच्या जोरावर जमीन खाली करावयाला लावत असाल, तर हे शहर सोडून जा. नाही तर तुम्हाला तुमच्या सात पिढ्यांची आठवण होईल अशी कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दम पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हेगारांना दिला.

पोलीस उपायुक्त परिमंडळ–५, पुणे शहरच्यावतीने सोमवारी किंमती मुद्देमाल वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, उप आयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे आदी उपस्थित होते.

### तर नागरिकांनी संपर्क करावा


पोलीस आयुक्त म्हणाले, अवैध धंद्याविरोधातील मोहिमेस आमचे प्राधान्य आहे. मद्य– गांजा विक्री, बेकायदा हुक्का पार्लर, बार उशिरापर्यंत सुरू असतील अथवा गैरकृत्य दिसल्यास नागरिकांनी पोलिसांशी तातडीने संपर्क करावा. एकदा निराकरण झाले नाही तर पुन्हा पुन्हा संपर्क करावा.'



पोलीस आयुक्त म्हणाले, पोलीस ठाण्यात बऱ्याच वर्षांपासून पडलेल्या बेवारस मुद्देमालाबाबतही अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. जे मुद्देमाल चोरीला जातात, त्या वस्तूंमागे संबंधितांच्या भावना असतात. कधीकधी आम्ही संवेदना विसरतो, काही महिलांचे मंगळसूत्र असतात, काही जणांची वाहने असतात. प्रत्येकाला ते परत मिळेल अशी अपेक्षा असते. लोकांना ते परत मिळवण्यासाठी वकिलांची फी भरून आणि कोर्टाच्या चकरा मारून वेळ जातो म्हणून आम्ही ही प्रक्रिया आमच्या बाजूने सुरू केली आहे. लोकांना आर्थिक बोजा येणार नाही, याची खात्री आम्ही घेतली आहे. आज ८० फिर्यादींना २ कोटी रुपयांपेक्षा अधिकचा मुद्देमाल परत करत आहोत. बेवारस वाहनांबाबत आता कारवाई करण्याचा सूचना दिल्या आहेत. त्याचे मालक शोधण्यासाठी सांगितले आहे. इतर बेवारस मुद्देमालसुद्धा तपासामधून त्यांच्या मालकांना शोधण्याचे सूचना दिल्या आहेत. लवकरात लवकर इतर परिमंडळातसुद्धा अशी कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे. बोपदेव घाट प्रकरणातसुद्धा स्थानिक पोलिसांच्या मदतीने आम्हाला आरोपी सापडले. जनता ही खाकीमधील पोलीस नसली तरीसुद्धा तुम्ही एक पोलीस आहात, जेवढे अधिकार आम्हाला आहेत तेवढेच अधिकार तुमच्याकडे आहेत. असेही अमितेश कुमार म्हणाले.

# पुणे महापालिकेने तयार केला ५० खाटांचा विलगीकरण कक्ष

पुणे : देशात एचएमपीव्हीचे रुग्ण आढळले असल्याने पुणे महापालिकेने आरोग्य यंत्रणा सतर्क करत उपाययोजना सुरु केल्या आहेत. रुग्णांच्या उपचारासाठी नायडू सांसर्गिक रुग्णालयात ५० खाटांचे स्वतंत्र विलगीकरण कक्ष तयार केला आहे. पण महापालिकेने दुसरीकडे लोहगाव विमानतळावर प्रवाशांची तपासणी सुरु केलेली नाही. त्यामुळे या विषाणूचा संसर्ग वाढण्याचा धोका आहे. याबाबतचा निर्णय पुढच्या बैठकीत घेतला जाईल, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



चीनमध्ये एचएमपीव्ही या साथरोगाचा उद्रेक झाला असून, अनेक राज्यांमध्ये हा विषाणू पसरलेला आहे. या विषाणूची लागण बंगळूरमधील एका आठ महिन्यांच्या मुलीलाही झाल्याचे आढळून आले आहे. भारतात या विषाणूचा पहिला रुग्ण आढळला आहे. त्यामुळे देशभरातील आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. यासंदर्भात राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून पुणे महापालिकेलाही खबरदारीसाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचना दिल्या आहेत. पुण्यातील लोहगाव विमानतळावर देशभरातील विविध शहरातून विमाने येतात. रोज हजारो प्रवाशांची तेथे वर्दळ असते. बंगळूर येथूनही पुण्यामध्ये विमानांची ये जा आहे. कोरोनाची साथ पसरत असताना महापालिकेच्या आरोग्य विभागाने विमानतळावर प्रवाशांच्या आरोग्याची तपासणी सुरु केली होती. त्यासाठी डॉक्टर, नर्स यांचे पथक तैनात केले होते. संशयित वाटणाऱ्या प्रवाशाला थेट नायडू रुग्णालयात पुढील तपासणीसाठी पाठविले जात होते.त्यामुळे साथ रोगावर नियंत्रण आणता येत होते. कोरोनाचे नवे व्हेरिएंट आल्यानंतरही अशा प्रकारची तपासणी केली जात होती.

बेंगळुरूमध्ये एचएमपीव्हीचे रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे महापालिकेला सतर्क राहण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले आहेत. पण अजूनही महापालिकेने विमानतळावर प्रवाशांची आरोग्य तपासणी सुरु केलेली नाही. त्यामुळे धोका वाढण्याची शक्यता आहे. आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे म्हणाल्या, ''लोहगाव विमानतळावर अद्याप प्रवाशांची तपासणी सुरु केलेली नाही. पुढच्या बैठकीत याबाबतचा निर्णय केला जाईल. या विषाणूंची चर्चा होत असली तरी त्यास घाबरू नये. पुणे महापालिकेची आरोग्य यंत्रणा तयार आहे.

# पैसे न दिल्याने स्टेशन परिसरात तरुणाच्या चेहऱ्यावर ब्लेडने वार

पुणे – पैसे देण्यास नकार दिल्यामुळे चोरट्याने एका तरुणाच्या चेहऱ्यावर ब्लेडने वार करून पैसे काढून घेतल्याची घटना पुणे रेल्वे स्टेशन परिसरात घडली. या परिसरात चोरट्यांकडून लुटमारीच्या घटना होत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या प्रकरणी वडिथा गोविंदा नाईक (वय २८, रा. अप्पर डेपोमागे, बिबवेवाडी) यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडिथा नाईक शनिवारी (ता. ४) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास पुणे रेल्वे स्टेशन परिसरातील




तुकाराम शिंदे वाहनतळ परिसरातून निघाले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांना अडवून पैशांची मागणी केली. नाईक यांनी चोरट्यास पैसे देण्यास नकार दिला. त्यावर चोरट्याने त्यांच्या चेहऱ्यावर ब्लेडने वार करून खिशातील आठशे रुपये काढून घेतले. त्यानंतर चोरटा पसार झाला. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकुमार कदम करीत आहेत. पुणे स्टेशन परिसरात चार दिवसांपूर्वी रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदाराने चाकणमधील तरुणाला लुटल्याची घटना घडली होती.

# ऑनलाइन शिधापत्रिकेचे संकेतस्थळ पंधरा दिवसांपासून बंद; कामकाज ठप्प

पिंपरी । प्रतिनिधी

शिधापत्रिका काढण्यासाठी नागरिकांची होणारी परवड थांबविण्यासाठी अन्नधान्य पुरवठा विभागाने शिधापत्रिकेची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. मात्र मागील आठ दिवसांपासून शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (आरसीएमएस) चे संकेतस्थळ बंद आहे. त्यामुळे शहरात शिधापत्रिकेच्या संबंधित ६० ते ६५ प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत.

नवीन शिधापत्रिका काढणे, नावे चढविणे, कमी करणे, विभक्त करणे अशा विविध कामासाठी नागरिकांना सेतू कार्यालयात येत असतात. काही वेळा दिलेल्या मुदतीत शिधापत्रिका धारकांना मिळत नाही. त्यामुळे नागरिकांची शिधापत्रिका मिळविण्यासाठी फरफट करावी लागते. तर काही वेळा दलालाकडून ही नागरिकांची आर्थिक लूट होत होती. असे प्रकार थांबविण्यासाठी यासाठी शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली ( आरसीएमएस) विकसित करण्यात आली आहे. शिधापत्रिका काढणे, शिधापत्रिकेमधील नावांची दुरुस्ती करणे, शिधापत्रिकेतील पत्ता बदलणे आदी कामे ऑनलाइन स्वरूपात केली जात आहेत. मात्र मागील पंधरा दिवसांपासून शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीचे संकेतस्थळ बंदच आहे. त्यामुळे शिधापत्रिका धारकांची ऑनलाइन स्वरूपात होणारी कामे रखडली आहेत. संकेतस्थळ सुरू नसल्याने पुरवठा विभागाच्या कर्मचार्यांना ही कामकाज करताना अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. नागरिक सातत्याने शिधापत्रिकेच्या संदर्भात विचारणा करण्यासाठी येतात त्यांना ही काम न होताच रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. संकेतस्थळ बंद असल्याने शहरातील शिधापत्रिकेच्या संदर्भात प्रकरणे प्रलंबित राहिली असल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली आहे. या संकेतस्थळाच्या संदर्भात वरिष्ठ स्तरावर तक्रार दिली आहे. शासनाने वरीष्ठ स्तरावरून यावर निर्णय घेऊन लवकरात लवकर संकेतस्थळ सुरू करावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. आरसीएमएसचे संकेतस्थळ बंद आहे. त्यामुळे काम करताना अडचणी येत आहेत. नागरिकांची कामे प्रलंबित राहत असल्याने त्यांच्या ही तक्रारी वाढत आहेत.

ऑफलाईन होते चांगले होते. शिधापत्रिकांची कामे ऑनलाइन केली आहेत. मात्र त्याचे वरीष्ठ स्तरांवरून नियोजन नसल्याने सातत्याने संकेतस्थळ बंद तर कधी चालतच नाही त्यामुळे कामे होत नाही. ऑफलाईनच्या वेळी नावे चढवणे, उतरविणे अशी कामे पटकन होत होती. आता संकेतस्थळ अडचणीमुळे कामे होत नाहीत. त्यामुळे ऑफलाईन होते तेच बरे होते अशी प्रतिक्रिया काही शिधापत्रिका धारकांनी दिली आहे.

# भाजीपाल्याचे दर पडल्याने शेतकरी अडचणीत

नारायणगाव। प्रतिनिधी

सध्या भाजीपाल्याची आवक घटली असली तरी बाजार पडल्याचे पहायला मिळत आहे. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव येथील उपबाजारामध्ये फ्लॉवर, कोबी, वांगी, चवळी तसेच घेवडा, फरशी अवघी ५ रुपये किलोने विक्री होत आहे, त्यामुळे शेतकरी वर्गापुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

निसर्गाचा लहरीपणा शेतकर्यांच्या मुळावर उठला आहे. रोगट व दूषित हवामानामुळे कीटकनाशक फवारणीचा खर्चदेखील वाढला आहे. कोथिंबीर व मेथी जुडीला दहा ते बारा रुपयाला विक्री होत आहे. अनेक शेतकर्यांनी कोथिंबीर व मेथी शेतातून काढणे सोडून दिले आहे. तर काही शेतकर्यांनी या पिकामध्ये मेंढरं सोडली आहेत. हिरवी मिरची, पापडी, वटाणे, चवळी, तोंडली, दोडका, दुधी भोपळा, काळी वांगी,



लिंबू, फ्लॉवर, कोबी, काकडी, घेवडा, मका या सगळ्यांचे बाजारभाव पडले आहेत. फक्त शेवगा आणि गवारीला चांगला बाजारभाव मिळत आहेत. शेवगा ७० ते १०० रुपये किलो व गवार ८० ते ९० रुपये किलो दराने विक्री होत आहे. टोमॅटोचे देखील दर सध्या पडले आहेत. २२ किलोचे क्रेट अवघे २०० रुपयांना विक्री होत आहे. फक्त गावठी टोमॅटोला ४०० रुपयांप्रमाणे क्रेट विक्री होत आहे. सध्याच्या रोगट हवामानाचा या पिकाला देखील फटका बसत आहे. त्यातच बीड, संगमनेर, पारनेर या भागातून टोमॅटो विक्रीला येत असल्यामुळे आवक वाढली आहे. तसेच इतर राज्यात देखील टोमॅटो सुरू झाल्याने टोमॅटोचे बाजारभाव पडले असल्याचे व्यापारी सांगत आहेत. साधारण एक महिना टोमॅटोचे बाजारभाव असेच राहतील असे बोलले जात आहे.

नारायणगाव उपबाजारात दुपारी दोन ते साडेतीन या वेळेत तरकारी भाजीपाल्याची विक्री होत असते. तर सकाळी ९ ते ११ वाजता टोमॅटोचा लिलाव होतो आणि सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजण्याच्या सुमारास कोथंबीर, शेपू, मेथी, कांद्याची पात यांचा लिलाव होत असतो. गेल्या १५ दिवसांपासून केळी व ऊस आणि द्राक्ष वगळून कोणत्याच पिकाला बाजारभाव नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. महागडी कीटकनाशके, खते वापरून भाजीपाला चांगला पिकवण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे भांडवली खर्च देखील निघत नाही, अशी खंत कैलासनगर येथील शेतकरी चंद्रकांत हांडे यांनी व्यक्त केली.

# शहरातील बड्या रद्दी व्यावसायिकाकडे ७० लाखाची खंडणी मागणारा अटक

पुणे । प्रतिनिधी

शहरातील एका बड्या रद्दी व्यावसायिकाला ७० लाखाची खंडणी मागून ती न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने एकाला अटक केली आहे. तो रद्दी व्यवसायीकाकडे अगोदर कामाला होता. मात्र कामावरुन आणि पगारावरुन वाद झाल्याने त्याने नोकरी सोडली होती. मालकाला धडा शिकवण्यासाठी त्याने पत्नीच्या मोबाईलवरुन फोन करुन खंडणी मागीतली होती.

मितीन देवलाल सरोज ( वय ३१, रा. ग्राम बभनपुर तहसिल सोराम, जिल्हा अलाहबाद, राज्य उत्तरप्रदेश



सध्या रा. लोहियानगर) असे अटक आरोपीचे नाव आहे. तो सध्या एका किराणा मालाच्या दुकानात कामाला आहे. याप्रकरणी सुरज बागमार यांनी फिर्याद दिली होती. त्यांना अनोळखी मोबाईल नंबरवरुन एक कॉल आला होता. कॉल करणाऱ्याने ६० ते ७० लाख रुपयांची खंडणी मागून पैसे न दिल्यास त्यांना व त्यांच्या परिवाराला जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्यांनी या प्रकरणी खडक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गुन्ह्याचा समांतर तपास युनिट एकच्या पथकाकडून सुरु होता. तांत्रीक तपास व खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनूसार फोन करणारा सरोज हा सोमवार पेठेतील एका दुकानात कामाला असल्याची खबर अंमलदार शुभम देसाई यांना मिळाली. यानूसार सरोजला ताब्यात घेण्यात आले. त्याने प्राथमिक चौकशीत बागमार यांच्याकडे काम करत असताना त्यांच्याशी पैशांवरुन झालेल्या वादातून हे कृत्य केल्याचे सांगितले आहे. ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शैलेश बलकवडे, उप-आयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) गणेश इंगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद, सहायक निरीक्षक अभिजीत पाटील, पोलीस अंमलदार शुभम देसाई, निलेश साबळे व विठ्ठल साळुंखे यांचे पथकाने केली आहे.

cmyk